# सगुणा

ऑ-नो-डि २०१३ । वर्ष-१ । अंक-४

**संपादकीय** । २

**मानाचे पान**
भांडवलशाहीतील बदलती नाती । *कॉम्रेड विलास सोनवणे* । ४

**निबंध**
शेती-आधारित उत्पादनव्यवस्थेची आजची परिस्थिती ।
*चित्रा चौगुले* । १३
बदलती खेडी । *मंगला गोविंद पोळ* । १८
हुंडा एक अनिष्ट प्रथा । *हसिना काझी* । २१
शहरीकरण व स्त्रियांचं बदलतं जग ।
*रंभादेवी गुंड* । २४
समाजकारणातील स्त्रियांची भूमिका । *शैलजा कदम* । २७

**पानपूरक**
महाराष्ट्राचा गावगाडा / *महर्षी विठ्ठल रामजी शिंदे* । २३

**मनमोकळं**
मन रीतं करण्याची 'ती' समृद्ध परंपरा हरवली... । *शरिफा बाले* । ३१
नातं : आनंदासाठी की द्वेषासाठी? । ३५

**अनुभव**
...हवा फक्त आत्मविश्वास । *कुमुद कोंडाळकर* । ३८

**कविता** । *शोभा करांडे* । ४०

संपादक
शोभा करांडे
(९४२२०१३५८८)

मुखपृष्ठ
मेहेबूब शेख

अक्षरजुळणी
पौर्णिमा गोडबोले

मूल्य : ३० रुपये
वार्षिक वर्गणी : १०० रुपये

MAHMAR/2013/52241
website:www.sagunatrust.org / Email:shobhakarande62@gmail.com
संपादकीय पत्रव्यवहार : सगुणा चॅरिटेबल ट्रस्ट, ७, माधव-लक्ष्मी अपार्टमेंट, २०७९, सदाशिव पेठ, विजयानगर कॉलनी, एस० पी० कॉलेजमागे, पुणे ४११ ०३० । दूरध्वनी : (०२०) २४३३७१२५ । ०९८२०२३५०३०

हा अंक मालक, मुद्रक, प्रकाशक शोभा करांडे यांनी श्रीबालाजी एंटरप्रायझेस, धायरीफाटा, सिंहगड रोड, पुणे येथे छापून सगुणा चॅरिटेबल ट्रस्ट, ७, माधव-लक्ष्मी अपार्टमेंट, २०७९, सदाशिव पेठ, विजयानगर कॉलनी, पुणे. ४११०३० येथे प्रसिद्ध केला.
(या अंकातील मतांशी संपादक मंडळ सहमत असतीलच असे नाही.)

सगुणा

संपादकीय

# बहुजन स्त्रीवादाच्या दिशेने...

जागतिकीकरण आणि उदारीकरणामुळे आज जगण्यावागण्याचे सगळेच संदर्भ, तऱ्हा बदलेल्या आहेत. विज्ञान-तंत्रज्ञानाचा विकास एका अत्युच्च टोकाला पोहचला आहे, तर भांडवलशाहीची आताची अवस्था ही भयंकर विकृत स्थितीला पोहचली आहे. परिणामी विकास होतोय, प्रगती होतेय, जीवनस्तर उंचावतोय अशी भाषाही दैनंदिन उच्चारली जातेय. सूक्ष्म दृष्टीनं पाहिलं तर हा सगळा खेळ सावल्यांचा आहे, भ्रम आणि आभासाचा आहे, असेच दिसते. कारण या सर्व खेळात माणूस, त्याचं स्वाभाविक जगणं, त्याच्या भावभावना, आदींचा मात्र चुराडा होत आहे, खूप काही चांगलं कायमचं हिरावलं जात आहे, अशीच ही स्थिती आहे.

या सगळ्या बदलत्या परिस्थितीत माणूसही आरापार बदलत जातो आहे. त्याचं जगणं, वागणं, बोलणं, विचार करण्याची पद्धत आदींमध्ये पुष्कळ बदल घडला आहे. वास्तव पाहता आजच्या काळात जगायचं असेल तर पैसा ही गोष्ट खूप महत्त्वाची आहे व पैसाच सर्वकाही करू शकतो, असा एक विचार मूळ धरून बसला आहे. त्यामुळे पैसा या गोष्टीला कधी नव्हे इतकं आज महत्त्व प्राप्त झालं आहे. पैसा, पद पाहूनच एखाद्याशी संबंध वा नातेसंबंध ठेवायचे की नाही हे ठरवलं जातं. थोडक्यात बाजाराला समोर ठेवून आता नातीही जोडली जात आहेत व नात्यांचाही बाजार झाला आहे, हा खरा आजच्या समाजासमोरील चिंतेचा मुद्दा आहे. परंतु या मुद्द्याकडे दुर्लक्ष करून सर्व प्रसारमाध्यमांतून भलतीकडेच चर्चा चालवली जात आहे. प्रसारमाध्यमांबरोबर, समाजातील लेखक, विचारवंत, कार्यकर्ते आदींकडूनही मूळ मुद्द्यांना बगल देऊन इतरच गोष्टींवर लक्ष दिलं जात आहे.

ही स्थिती पाहता मूळ मुद्द्याला हात घालणारी चर्चा करावी, या विचारातून 'सगुणा'च्या या अंकात आम्ही 'नातं' हा विषय तत्परतेनं चर्चेला घेतला आहे.

शेती-केंद्रित समाजात आहे रे समजल्या जाणाऱ्या त्रिवर्णांमध्ये (ब्राह्मण-क्षत्रिय-वैश्य) स्त्री धनाची संकल्पना रूढ होती व हे स्त्रीधन बहुधा हुंडा, रुखवत वा आहेराच्या रूपानं दिलं जात होतं.

कष्टकरी शूद्र वर्णांतील जातींमध्ये मात्र त्या त्या जातीच्या उत्पादनात स्त्रियांच्या श्रमाचा हिस्सा पुरुषांपेक्षा अधिकच होता. त्यामुळे मुलगी लग्न होऊन नवऱ्याच्या घरी जाणार म्हणजे आपल्या घरातला कष्ट करणारा 'एक हात' कमी होणार, अशी संकल्पना त्यावेळी रूढ होती. बापाच्या घरातला कष्ट करणारा एक हात कमी होणार आणि तोच हात सासरच्या घरातील कष्टांना हातभार लावणारा होता. हे पाहता मुलीकडच्या लोकांना त्या 'हातभारा'चा मोबदला देण्याची पद्धत होती.

पुढे शेती बाजारकेंद्रित होऊ लागली. ती बाजारकेंद्रित व्हावी अशीच धोरणं राबवली जाऊ लागली. बहुजनांतली पहिली पिढी शिकली आणि त्या पिढीचे पहिले शिक्षित नोकऱ्या वगैरे करू लागले. बहुजनांतल्या या शिकलेल्या लोकांनी जीवनशैली म्हणून उच्चवर्णियांचे अनुकरण करायला सुरुवात केली. आपण ब्राह्मणांसारखं दिसलं, वागलं, बोललं, राहिलं पाहिजे, असा एक विचार कळत नकळत बहुजन शिक्षितांमध्ये रुजला.

आचारविचारांचे अनुकरण करत ह्या पिढीनं मुलींकडून हुंडा घेण्याची पद्धत रूढ करायला सुरुवात केली. हरितक्रांतीनंतरच्या काळात याचा अतिरेक झाला. नेमाड्यांच्या चांगदेव चतुष्ट्याचे सगळे नायक म्हणजे या पहिल्या पिढीचे प्रतिनिधीच होत. या परिस्थितीचा फायदा उठवत 'मुलगी झाली हो'सारख्या नाटकांच्या माध्यमातून ब्राह्मण स्त्रियांचे प्रश्न आणि बहुजन स्त्रियांचे प्रश्न एकच आहेत, असा आभास निर्माण करण्यात ब्राह्मणी स्त्रीवाद यशस्वी झाला.

पण वास्तव स्थिती पाहिली तर ते प्रश्न तसे एकच नाहीत. बहुजन स्त्रियांचे प्रश्न खूप निराळे आहेत आणि ते वरवर पाहून, समजून घेता येणं केवळ अशक्य आहे. ते समजून घेण्यासाठी आपणाला प्रत्यक्ष बहुजन समाज, त्यातील विविध जाती, त्यांच्या चालीरीती, परंपरा, कृषिसंस्कृती, त्यांचे परस्परांतील आंतरसंबंध, उत्पादन पद्धतीच्या संदर्भात एकमेकांना पूरक असणं, बदलती समाजस्थिती, आदींचा माग काढत खूप पाठीमागे जावं लागणार आहे. अशा पद्धतीचा विचार आणि अभ्यास आपल्याकडे अलिकडच्या काळात सुरू झालेला आहे. त्यात विशेषतः कॉम्रेड शरद् पाटील, डॉ० भालचंद्र नेमाडे, कॉम्रेड विलास सोनवणे आदींच्या योगदानाचा आवर्जून उल्लेख आपणाला करावा लागतो. म्हणूनच त्या संदर्भातील चर्चा इथवरच न थांबता ती कायम चालू राहावी असे आम्हांस वाटते. त्यामुळे बहुजन स्त्रीवादाच्या संदर्भात स्पष्टता यावी, बहुजन स्त्रियांचे प्रश्न, तसेच आदींवर अधिक जोरकसपणे वेगवेगळ्या अंगाने प्रकाशझोत पडावा म्हणून मागील काही अंकापासून आम्ही यासंबंधीचं विचारप्रवृत्त करणारं लेखन छापत आहोत. या अंकात आजच्या संदर्भात स्त्रीपुरुषांच्या बदलत्या नात्यांचा ताळेबंद मांडण्याची सुरुवात करत आहोत. या संबंधीच्या आपल्या प्रतिक्रिया जाणून घेणं आमच्या दृष्टीनं महत्त्वाचं आहे. ■

सगुणा

मानाचे पान

# भांडवलशाहीतील बदलती नाती

कॉम्रेड विलास सोनवणे

लेखाच्या शीर्षकावरून नात्याबद्दलच्या दोन कल्पना स्पष्ट होतात :

१. भांडवलशाहीपूर्व समाजातील नाती.

२. भांडवलशाही समाजातील नाती.

माणूस एक सामाजिक प्राणी आहे, असं जगातील सर्व सामाजिकशास्त्रे मानतात. समाज म्हटलं की सामूहिकता आली. माणूस हा समूह करून जगणारा प्राणी आहे. वाघ, सिंह, हत्ती, गेंडा, जिराफ, गाई, म्हशी इत्यादी प्राण्यांच्या तुलनेत माणूस हा शारीरिकदृष्ट्या दुबळा प्राणी आहे. माकडापासून माणूस होण्याच्या उत्क्रांतीच्या प्रक्रियेत माणूस त्याच्या हाताचा उपयोग जसजसा एखाद्या हत्यारासारखा करू लागला, तसतसे हे हात नावाचे हत्यार चालवण्यासाठी तीन गोष्टींची आवश्यकता निर्माण झाली : १. हत्यार चालवण्यासाठी विचार करणे. २. हत्यार चालवण्यासाठी शारीरिक श्रम करणे. ३. निसर्गात रहून निसर्गाकडूनच अस्तित्वासाठी अन्न मिळवायचे असेल तर समूहाने राहणे ही अपरिहार्यता आहे.

झाडावर लागलेले एखादे फळ, एखादी व्यक्ती हाताने तोडू शकते, पण त्याच्यापेक्षा बलवान प्राण्याशी सामना करायचा असेल तर समूहाने राहण्याशिवाय पर्याय नाही. आणि समूहाने राहायचं असेल तर सामूहिकपणे अस्तित्व टिकवण्यासाठी, सामूहिकपणे विचार करणे यालाही पर्याय नाही. माणसाच्या समूहातून राहण्याच्या या गरजेतून 'नाती' निर्माण झाली.

समाजातील नाती निर्माण होण्याच्या प्रक्रियेमध्ये साहजिकच पुन्हा निसर्गाचे नियम महत्त्वाचे ठरले. म्हणजे आई मूल जन्माला घालते. त्यामुळे स्वाभाविकपणे मुलांच्या दृष्टीने आई श्रेष्ठ ठरली. त्यातूनच मातृसत्ताक समाजव्यवस्था जन्माला आली. आपल्याकडील आदिमातेची कल्पना ही या मातृसत्ताक सामाजिक व्यवस्थेचेच प्रतीक आहे.

निसर्गापासून अन्न गोळा करण्याच्या काळापासून ते शिकार करण्याच्या काळापर्यंत; आणि शिकारीसाठी

अणकुचीदार दगडांचा वापर करण्यापासून ते अग्नीचा शोध लागेपर्यंत समाजाच्या केंद्रस्थानी 'माता'च होती. ही माता मुलाला जन्म देत होती, त्याचं संगोपन करत होती. त्यासाठी निसर्गातून अन्न गोळा करत होती. त्याच्यासाठी शिकार करत होती. त्याला ऊन, वारा, पाऊस यांपासून वाचवण्यासाठी डोंगरातल्या नैसर्गिक गुहा, जंगलामधल्या पोकळी किंवा ढोली शोधत होती. नैसर्गिक आपत्तीमध्ये प्रसंगी स्वत:चं बलिदान करून त्याचं रक्षण करत होती. जंगली पशूंपासून त्याचं संरक्षण करत होती. त्यामुळे तिच्यापासून जन्माला आलेली संतती व ती आई हे जगातील मानवी समाजातील पहिलं नातं होतं.

ही मातृसत्ताक व्यवस्था कालांतराने 'स्त्रीसत्ताक' व्यवस्थेत बदलली. कारण शिकार करण्यासाठी, निसर्गाशी झगडण्यासाठी शारीरिक ताकदीसोबत नेतृत्वाच्या क्षमतेचीदेखील कसोटी लागत असे. या कसोटीत आजारी, वयोवृद्ध आई टिकेलच याची खात्री नव्हती. त्यामुळे त्या आईची नेतृत्वक्षम व शरीराने सुदृढ अशी तिची मुलगी तिची जागा घेऊ लागली. हळूहळू मातृसत्ताक पद्धतीतील माता आदराचं स्थान झाली. पण सत्ता मात्र मुलीच्या हाती गेली. मातृसत्ताक व स्त्रीसत्ताक व्यवस्थेमध्ये पुरुषांची जागा शिकारी करिता किंवा अन्य कामाकरता सहयोग करणे व वंशवृद्धी करता बीज देणे, या पलीकडे नव्हती. म्हणून दोन टोळ्यांमधील संघर्षात पराभूत होणाऱ्या पुरुषांना विजेती टोळी ठार करून टाकत असे व स्त्रियांना पकडून टोळीच्या दुय्यम कामासाठी वापरण्यात येत असे. राहुल सांस्कृत्यायन यांच्या 'व्होलगा ते गंगा' या पुस्तकात याविषयी सखोल चर्चा आहे. तसेच फ्रेडरिक एंगल्स यांनीही 'कुटुंब, खासगी मालमत्ता व राज्यशासन' या पुस्तकात याची सखोल चर्चा केली आहे.

टोळीमधल्या गरोदर स्त्रिया पाण्याच्या जवळ राहत असत. उर्वरित टोळी शिकारीसाठी किंवा नैसर्गिक अन्न गोळा करायला गेल्याच्या काळात म्हणजे साधारणत: सातव्या महिन्यापासून ते नवव्या महिन्यापर्यंत या समूहाने राहणाऱ्या गरोदर स्त्रिया टोळी परत येण्याची वाट पाहत पाहत झाडावरून पडणारी फळं, त्यांच्या मातीत रुजणाऱ्या बिया, त्या बियांना फुटणारे कोंब व त्यातून निर्माण होणारी झाडे या निसर्गाच्या चक्राचे निरीक्षण करता करता निसर्गाचे नियम समजावून घेऊ लागल्या. नदीच्या काठी उगवलेल्या गवताचे कोणते दाणे पशुपक्षी खातात, याचं निरीक्षण करता करता त्यांना धान्याच्या विविध प्रकारांचा शोध लागला. यातूनच स्त्रियांनी 'शेतीचा शोध' लावला. शेतीचा शोध, अग्नीचा शोध या मानवी समूहाच्या जीवनातील अत्यंत क्रांतिकारी घटना आहेत. डोंगराच्या उतारावरून घरंगळत जाणाऱ्या गोल दगडामुळे मानवी समूहाने गतीचे तंत्र आत्मसात केले. अग्नीचे तंत्र, शेतीचे तंत्र, गतीचे तंत्र या तिन्हीही तंत्राने मानवी समाजामध्ये विलक्षण क्रांत्या झाल्या. सामूहिक अस्तित्वासाठी शिकार करणे, ही गरज राहिली नाही. म्हणून शिकार दुय्यम झाली. पुढे पुढे ती मनोरंजन झाली.

सुरुवातीच्या शिकारीच्या काळामध्ये कुत्र्यासारख्या प्राण्यांशी माणसाने मैत्री सुरू केली. जगातल्या सर्व मानवी समूहाने माणसाळवलेला पहिला प्राणी कुत्रा होता. शिकारीसाठी वेगाची आवश्यकता होती, या वेगासाठी मानवी समूहाने घोड्याशी मैत्री सुरू केली. घोडा माणसाळवलेला दुसरा प्राणी होता. पुढे शेतीचा शोध लागल्यानंतर गाय, बैल, म्हैस, रेडा, वाळवंटी प्रदेशात उंट, हत्ती, हिमालयासारख्या पहाडी प्रदेशांत खेचर इत्यादी प्राण्यांशी मैत्री करून माणसाने त्यांना माणसाळवले.

या संपूर्ण प्रक्रियेमध्ये मानवी समूह नाती प्रस्थापित करण्याच्या संदर्भातदेखील एक क्रांतिकारी पाऊल उचलत होता. मानवी समूहाने स्वत:च्या गरजांपोटी विविध जातींच्या प्राणी समूहाशीसुद्धा नाती प्रस्थापित केली. शेतीचा शोध लागेपर्यंत व तो लागून शेती उपजीविकेचे मुख्य साधन होईपर्यंत मानवी समाजामध्ये खासगी मालकी नावाची कल्पना अस्तित्वात आली नव्हती. तसेच कुटुंबसंस्था नावाची गोष्टही अस्तित्वात आली नव्हती. त्यामुळे आज प्रचलित असलेले पती-पत्नी किंवा नवरा-बायको ही नातीही अस्तित्वात आली नव्हती. त्या-त्या

■

तंत्र व कौशल्य आत्मसात करण्यामध्ये स्त्रिया सगळ्यात अग्रेसर होत्या. त्यामुळे त्या सगळ्याच स्त्रिया 'शूद्र' ठरवल्या गेल्या. यातील ज्या स्त्रियांचा शेती-उत्पादनाशी निगडित तंत्र व कौशल्याशी संबंध राहिला नाही, त्या स्त्रिया उच्चवर्णीयांच्या प्रजोत्पादनाच्या, मनोरंजनाच्या, विविध क्रीडांच्या साधन ठरल्या व त्यांना ज्ञानवंचित घोषित केले गेले. ज्या स्त्रिया प्रत्यक्ष शेती व शेतीपूरक तंत्र व कौशल्यात अग्रेसर राहिल्या त्यांची त्यांच्या त्यांच्या जातीगटांत आपली म्हणून एक अशी ओळख शिल्लक राहिली.

------

टोळीच्या आदिमातेपासून निर्माण झालेली 'कुल' आणि 'कुळ' अस्तित्वात होते. सगळी मुलं ही आईची मुलं होती म्हणूनच 'मातृसत्ता' होती.

शेतीचा शोध लागल्यानंतर समाजाच्या गरजेपेक्षा अधिक झालेल्या उत्पादनाच्या संरक्षणाचा प्रश्न निर्माण झाला. स्त्रियांनी उत्पादनावर नियंत्रण ठेवण्यासाठी शेतीचा स्वीकार केला, तर दुसऱ्या टोळीपासून उत्पादनाच्या व उत्पादक स्त्रियांच्या संरक्षणाची जबाबदारी पुरुषांना दिली गेली. संरक्षणाच्या निमित्ताने सशस्त्र झालेल्या पुरुषांनी हळूहळू स्त्रियांना शेतीच्या कामात व शेतीपूरक कामात आवश्यक झालेल्या व श्रमविभाजन वाट्याला आलेल्या पुरुषांनादेखील शेतीकेंद्रित, पशुकेंद्रित उत्पादनव्यवस्थेत जखडून टाकले व समाजाचे पुरुषसत्ताक वर्णव्यवस्थेत विभाजन केले.

माकडापासून माणूस होण्याच्या उत्क्रांतीच्या प्रक्रियेत मातृसत्ताक व स्त्रीसत्ताक मानवी समाजाने निसर्गाचे नियम समजावून घेतले. आत्मसात केले. हेच नियम एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे मौखिक परंपरेतून व सहज ज्ञानाच्या प्रक्रियेतून हस्तांतरित होण्याची प्रक्रिया या काळात अव्याहतपणे सुरू होती. शेतीच्या शोधानंतर विकसित होत गेलेली विविध तंत्रे व कौशल्य आधी तांबे व नंतर लोखंड या धातूंच्या शोधानंतर अधिकच विकसित होत गेले. विशिष्ट तंत्र व विशिष्ट कौशल्याच्या आधारे मानवी समूहाचे छोट्या छोट्या गटात रूपांतर होत गेले. हेच गट त्या पुढील काळात 'जात' या नावाने ओळखले जाऊ लागले.

तंत्र व कौशल्य छोट्या छोट्या जातींत विभागले जाणाच्या प्रक्रियेत स्थूल ज्ञानाचे काय करायचे? हा प्रश्न निर्माण झाला. स्थूल ज्ञानाची मौखिक परंपरा चालवणाऱ्या या गटाने स्वत:ला 'ज्ञानी' घोषित केले. हा 'ज्ञानी' म्हणजे 'ब्राह्मण.'

अशा तऱ्हेने ज्ञानावर कब्जा करणारे ते 'ब्राह्मण.' शस्त्रावर व सत्तेवर कब्जा करणारे ते 'क्षत्रिय.' तंत्र व कौशल्य आत्मसात करण्यामध्ये स्त्रिया सगळ्यात अग्रेसर होत्या. त्यामुळे त्या सगळ्याच स्त्रिया 'शूद्र' ठरवल्या गेल्या. यातील ज्या स्त्रियांचा शेती-उत्पादनाशी निगडित तंत्र व कौशल्याशी संबंध राहिला नाही. त्या उच्चवर्णीयांच्या प्रजोत्पादनाच्या, मनोरंजनाच्या, विविध क्रीडांच्या साधन ठरल्या व त्यांना ज्ञानवंचित घोषित केले गेले. ज्या स्त्रिया प्रत्यक्ष शेती व शेतीपूरक तंत्र व कौशल्यात अग्रेसर राहिल्या त्यांची त्यांच्या त्यांच्या जातीगटात आपली म्हणून एक अशी ओळख शिल्लक राहिली.

ज्ञान, सत्ता व शस्त्र, तंत्र व कौशल्य यांच्या विस्ताराच्या प्रक्रियेत समाजाच्या गरजेपेक्षा जास्त - अतिरिक्त उत्पादन होऊ लागले. हे अतिरिक्त उत्पादन म्हणजे संपत्ती. या संपत्तीच्या निर्मिती व मालकीच्या प्रश्नामुळे वारश्याचा प्रश्न निर्माण झाला. तोपर्यंत जन्माला येणारं प्रत्येक मूल हे आईचं मूल होतं आणि तीच त्याची ओळख होती. पुरुषांनी संपत्तीवर कब्जा केल्यामुळे

पुरुषांचा वारस कोण? त्याला जन्म देणारी आई कोण? ती आई एकाच पुरुषांशी बांधील असेल तरच तिने जन्माला घातलेली संतती त्या पुरुषांची वारस ठरेल. अशा तऱ्हेने पुरुषांचा वारस ठरवण्याचा प्रश्न सोडवण्यासाठी 'कुटुंबसंस्था' व 'लग्नसंस्था' यांना पुरुषसत्तेने जन्म दिला. सोबतच स्त्रीपुरुषांमधील विषमता पक्की केली. नंतरची हजारो वर्षे- जोपर्यंत शेती ही उत्पादनाच्या केंद्रस्थानी होती- या व्यवस्थेत फारसे बदल झाले नाही.

सत्तेची मातृसत्ताक संकल्पना व पितृसत्ताक संकल्पना या पूर्णपणे भिन्न संकल्पना आहेत. जमीन, पशुधन, जमिनीच्या मशागतीमध्ये गुंतलेल्या स्त्रिया व पुरुष हे सगळं 'संपत्ती' नावाच्या संकल्पनेत बंदिस्त होणाऱ्या प्रक्रियेमध्ये खासगी मालमत्ता किंवा खासगी संपत्ती ही गोष्ट उदयाला आली. या खाजगी संपत्तीच्या संरक्षणासाठी राज्यसत्ता किंवा राज्यशासन या गोष्टींचा उदय झाला व त्यानुसार आकाराला आलेल्या श्रमविभाजनातून भारतामध्ये वर्णव्यवस्था आकाराला आली. या वर्णव्यवस्थेने श्रमाचे बौद्धिक श्रम व शारीरिक श्रम असे विभाजन केले. बौद्धिक श्रम करणाऱ्यांनी म्हणजे समाजाच्या सामूहिक श्रमातून निर्माण झालेल्या ज्ञानाचे सूत्रीकरण करणाऱ्यांनी स्वत:ला ब्राह्मण म्हणून घोषित केले. 'ब्रह्म' म्हणजे 'ज्ञान'. विश्वाच्या चलनवलनाचे निसर्गाशी झगडता झगडता मानवी समाजाने आकलन केलेले नियम म्हणजे 'ज्ञान.' साहजिकच या ज्ञानाचे सूत्रीकरण करणाऱ्यांना उर्वरित समाजानेदेखील श्रेष्ठ मानले. यातूनच ज्ञानसत्तेचा उदय झाला. म्हणजे वर्णव्यवस्थेने ज्ञानालादेखील संपत्ती मानायला सुरुवात केली. या संपत्तीचे रक्षण करणारा तो ज्ञानाचा सत्ताधीश बनला. या ज्ञानसत्तेच्या मदतीने शासन करणाऱ्याचा एक वर्ण उदयाला आला. तो म्हणजे 'क्षत्रिय.' प्रत्यक्ष शेती कसणाऱ्या स्त्री पुरुषांना दास बनवत. त्या शेती उत्पन्नाचा व्यापार करणाऱ्यांचा एक वर्ण उदयाला आला, तो म्हणज 'वैश्य.' शारीरिक श्रम करणारा तो 'शूद्र'. म्हणजे ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र, असे चार वर्ण जन्माला आले. या चारही वर्णाच्या पुरुषांनी मात्र स्त्रियांना खासगी मालकीची संपत्ती मानले. ज्या स्त्रिया लग्नसंस्थेद्वारे कुटुंबसंस्थेच्या चौकटीत बंदिस्त झाल्या नाहीत, त्या सगळ्या समाजाच्या सामूहिक मालकीच्या श्रेणीबद्ध गणिका किंवा वेश्या बनल्या.

वर्णव्यवस्थेने स्त्रियांवरची खासगी मालकी अधोरेखित केल्यानंतर त्या विरोधात झालेल्या जैनांच्या अथवा बौद्धांच्या सामाजिक विद्रोहात भाग घेणाऱ्या स्त्रियांची संख्या लक्षणीय असूनदेखील त्यांच्या दुय्यम स्थानामध्ये फारसा फरक पडला नाही. जैनांच्या व विशेषत: बौद्धांच्या समताधिष्ठित सामाजिक विद्रोहामुळे जन्माधिष्ठित श्रेष्ठत्वाच्या संकल्पनांना मोठे आव्हान उभे राहिले. बुद्धामुळे विज्ञाननिष्ठा आली. सम्राट अशोकापासून राजाश्रय मिळाल्यामुळे समाज वेगाने पुढे सरकला. या प्रक्रियेत अनेक पातळ्यांवर सूक्ष्मतंत्राचा विकास होऊन ते तंत्र आत्मसात करणारे अनेक नवनवे समूह शूद्रांमध्ये निर्माण झाले. या सर्व शारीरिक कष्ट करणाऱ्या व तंत्राशी बांधल्या गेलेल्या समूहात स्त्रियांचे स्थान उत्पादनात बरोबरीचे किंवा पुरुषापेक्षा जास्त असल्यामुळे कष्ट करणाऱ्या समूहामध्ये (जातीमध्ये) स्त्रियांना उच्चवर्णातील स्त्रियांपेक्षा तुलनेने व्यक्ती म्हणून स्वत:चा ठसा उमटवण्याला अधिक संधी उपलब्ध होती. सहाव्या शतकापर्यंत जैन प्रामुख्याने वैश्यांमध्ये व काही प्रमाणात पश्चिम व दक्षिण भारतामध्ये (विशेषत: दिगंबर जैन) उत्पादक जातींमध्ये बंदिस्त झाले. पुष्यमित्र संघाच्या नेतृत्वात ब्राह्मणांनी बौद्ध भिक्खूंचे सामूहिक शिरकाण करत बौद्ध धम्माची ओळख व अस्तित्व पुसून काढण्याचा यशस्वी प्रयत्न केला. समतेची चर्चा व आग्रह थांबवला. कर्मसिद्धान्ताच्या आधाराने जातिव्यवस्था, जन्माधिष्ठित घोषित करून ब्राह्मण वर्णाच्या नेतृत्वात त्रिवर्णींनी ज्ञानसत्ता, राज्यसत्ता व धनसत्ता यांवर मक्तेदारी प्रस्थापित केली.

सातव्या शतकापासून अरबी समुद्राच्या किनाऱ्यावरील पश्चिम व दक्षिण भारतात इस्लामच्या आगमनाने पुन्हा एकदा सामाजिक समतेच्या चर्चा सुरू

झाल्या. यामुळे सातव्या शतकाच्या मध्यापासून उत्पादनाची साधने ज्यांच्या मालकीची होती ते, शेतकरी जाती, शेतीपूरक व्यवसायाशी निगडित असलेल्या मध्यमजातींमध्ये मोठ्याप्रमाणावर समतेचे आकर्षण निर्माण झाले. या पश्चिम किनाऱ्यावरील व दक्षिण भारतामधील लोकांनी समतेच्या आकर्षणातून इस्लाम स्वीकारला. बाराव्या शतकात आधी अफगाण व नंतर तुर्कांनी खैबर खिंडीतून उत्तरेकडे आक्रमण करून दिल्लीची सत्ता काबीज केली. तुर्क दिल्लीचे सत्ताधीश झाल्यानंतर अल्लाऊद्दीन खिलजीच्या दक्षिण दिग्विजयानंतर भारतातील ब्राह्मण व क्षत्रिय वतनदारांनी आपली वतने टिकवण्यासाठी इस्लाम धर्म स्वीकारायला सुरुवात केली. या धर्मांतरांनी येथील सामाजिक रचनेमध्ये कोणतेही मूलभूत बदल घडले नाहीत. त्यामुळे स्त्री-पुरुष नाते व एकूणच नातेसंबंधांमध्ये कोणतेही बदल घडले नाहीत. वैश्यांनी इराणशी, अरबस्तानशी व पूर्व आफ्रिकेतील देशांशी व्यापार वाढवण्यासाठी म्हणून इस्लाम धर्म स्वीकारला. त्यामुळे त्यांचा व्यापार आंतरराष्ट्रीय झाला. परंतु सामाजिकरचनेमध्ये व रचनेच्या आधाराने निर्माण झालेल्या नातेसंबंधामध्ये कोणताही मूलभूत बदल झाला नाही.

अरब व तुर्क राज्यकर्ते व्यापारी म्हणून इथे स्थायिक होण्याच्या प्रक्रियेत ते भारतीय समाजाचा भाग बनले. जेते असल्यामुळे त्यांनी उच्चवर्णियांमध्ये काही नव्या जातींची भर घातली. येथील उच्चवर्णियांनी यापूर्वी भारतात अस्तित्वात नसलेली बुरखापद्धतीची सक्ती तुर्क व अरब नेत्यांचे अनुकरण करून उच्चवर्णियांतील स्त्रियांवर केली. डोक्यावरून पदर घेणे, घुंगट घेणे इ० हे बुरखापद्धतीचे भारतीय स्वरूप आहे. उच्चवर्णियांतल्या याच मंडळींनी स्वत:ला खानदानी म्हणून घ्यावयास सुरुवात केली व स्त्रियांच्या पुनर्विवाहाला बंदी घातली. अशारीतीने उच्चवर्णियांनी स्वत:चे खानदानीपण सिद्ध करण्यासाठी स्त्रियांची गुलामी अधिक जाचक केली. इस्लाम हा स्त्री-पुरुष समतेचा आग्रह धरणारा धर्म होता. माणसा-माणसांमधली कुठल्याही प्रकारची विषमता नाकारणारा धर्म होता. येथील उच्चवर्णीय मुसलमान झाले, पण ते होताना त्यांनी इस्लामची सर्व शिकवण व समतावादी तत्त्वज्ञान नाकारले.

सत्ता व संपत्ती टिकवण्यासाठी उच्चवर्णियांमध्ये धर्मांतर सुरू झाल्याबरोबर शूद्रातिशूद्र उत्पादक जातींचे धर्मांतर थांबले. त्यांनी इस्लामची एकेश्वरवादी, समतावादी शिकवण स्वीकारून आपापले पंथ स्थापन करून उच्चवर्णियांच्या विरोधात विद्रोहाची सुरुवात केली. दक्षिण भारतामध्ये बसवेश्वरांनी 'लिंगायत पंथा'ची स्थापना केली. श्रीचक्रधर स्वामींनी 'महानुभव पंथा'ची स्थापना केली. ज्ञानेश्वरांनी नामदेवांकडून दीक्षा घेऊन 'वारकरी पंथा'चा पुढे विस्तार केला. बाबा फरिद, बुल्लेशहा व नामदेवांना सोबत घेऊन गुरुनानकांनी 'शीख धर्मा'ची स्थापना केली. गुजरातमध्ये जलारामबाप्पा, कच्छ-राजस्थानमध्ये अग्रसेन महाराज, उत्तर भारतामध्ये कबीर व रोहिदास, रोहिदासांची शिष्या मीरा आदी.

संपूर्ण भारतामध्ये बाराव्या शतकापासून सुरू झालेल्या समताधिष्ठित एकेश्वरवादी विद्रोहाचे ठळक वैशिष्ट्य म्हणजे पुरुषांच्या बरोबरीने स्त्रिया त्याचं नेतृत्व करू लागल्या. मातृसत्तेचा-स्त्रीसत्तेचा ऱ्हास झाल्यानंतर पहिल्यांदा मध्ययुगात सुरू झालेल्या विद्रोहांमुळे स्त्रिया पहिल्यांदाच पुरुषांच्या बरोबरीने, केंद्रस्थानी ताठ मानेने व विद्रोही मुद्रेने उभ्या राहिल्याचं आपण पाहतो. प्रत्येक पंथामध्ये उदा० बसवेश्वरांबरोबर अक्कमहादेवी, चक्रधरांसोबत महदाईसा, नामदेवांसोबत जनाबाई, ज्ञानेश्वरांसोबत मुक्ताई, तुकोबांसोबत बहिणाबाई, रोहिदासांसोबत मीराबाई इ० स्त्रियांची नावं घेतल्याशिवाय त्या त्या पंथाची ओळखच पटणे शक्य नाही. या सगळ्याचे राजकीय परिणाम अपरिहार्य होते. अकबराने स्थापन केलेल्या दिने-इ-इलाई या पंथाची स्थापना असेल, चाँदबीबीच्या नेतृत्वामध्ये मध्य महाराष्ट्राने मोगलांना दिलेले आव्हान असेल, अथवा जिजाऊंच्या आधाराने सतराव्या शतकात महाराष्ट्रात शिवाजीमहाराजांनी उभे केलेले आव्हान

असेल- म्हणजे पंथाची चर्चा असो वा राजकारण असो सगळीकडे केंद्रस्थानी स्त्रियाच नेतृत्वाची भूमिका अदा करताना दिसतात.

याचे सामाजिक परिणाम अपरिहार्य होते. मध्ययुगातल्या या एकेश्वरवादी सामाजिक, समतावादी चळवळींनी ज्ञानभाषा म्हणून संस्कृत व पारशी भाषेचे प्रभुत्व नाकारले व उत्पादक जातींत विखुरलेल्या स्त्री शूद्रातिशूद्रांच्या भाषा या 'ज्ञानभाषा' म्हणून स्वीकारल्या. गुजरातेतून आलेला एक चक्रधर नावाचा ब्राह्मण अमरावती जिल्ह्यात रमतो व 'लीळाचरित्र' नावाचा मराठीतील पहिला ग्रंथ लिहून ज्ञानावरची ब्राह्मणांची मक्तेदारी मोडीत काढतो. संत नामदेव, ज्ञानेश्वर, एकनाथ, सावतामाळी, गोरा कुंभार, सेना न्हावी, चोखामेळा यांच्यापासून ते तुकोबा- बहिणाबाईपर्यंत ही विद्रोहाची परंपरा विस्तारताना दिसते. तसेच 'वेदांचा तो अर्थ आम्हासीच ठावा, येरांनी व्हावा भार माथा' असं म्हणत. ज्ञानी असण्याचा ब्राह्मणांच्या नेतृत्वातील त्रिवर्णांचा ज्ञानाचा अहंगड तुकोबा मोडीत काढतात. ब्राह्मण जातीत जन्मलेली बहिणाबाई तुकोबांचं शिष्यत्व पत्करून या विद्रोहाचा एक भाग बनते व ते करताना बहिणाबाई जरी ब्राह्मणांची असली तरी शूद्रच असते, असं सिद्ध करत शूद्रांच्या विद्रोहात सामील होते.

भारत वर्ष, हिंदुस्थान, आर्यावर्त, अशा श्रेष्ठवर्णीय राष्ट्रसंकल्पनेला शूद्रांच्या भाषेच्या आधाराने शूद्रांच्या भाषिक राष्ट्रवादाचा पाया याच विद्रोहातून आकाराला येतो. छत्रपती शिवाजी व त्यांची आई जिजाऊ हा मराठी भाषिक राष्ट्रवादाचा पहिला राजकीय आविष्कार होता. या सगळ्यांचा नातेसंबंधावर काय परिणाम झाला असावा? चंद्रभागेच्या वाळवंटात धर्मभेद व जातिभेद बाजूला सारत एकमेकांच्या पायांवर डोके ठेवणारे सर्व वारकरी मी माझा अहंकार गमावतो आहे, असं म्हणताना तो स्वतःचा पुरुष म्हणूनचा अहंकार गमावतो; वतनदार म्हणूनचा अहंकार गमावतो; वडीलकीचा अहंकार गमावतो; मोठेपणाचा अहंकार गमावतो. आणि फक्त अहंकारच गमावत नाही तर व्यवस्थेने दिलेला स्त्री म्हणूनचा न्यूनगंड, जात म्हणूनचा न्यूनगंड, अस्पृश्य म्हणूनचा न्यूनगंड इ० असे सगळेच न्यूनगंड चंद्रभागेच्या वाळवंटात नाकारले जातात. ही अहंकार गमवण्याची व न्यूनगंड नाकारण्याची परंपरा बाराव्या शतकापासून एकविसाव्या शतकापर्यंत अखंड चालू आहे. याचा सर्वच नातेसंबंधांवर कमी-अधिक प्रमाणात परिणाम होत आलेला आहे. जात नावाच्या उत्पादनव्यवस्थेने तंत्राधिष्ठित श्रमविभाजनामुळे छोट्या - छोट्या जातीत विभागलेल्या स्त्री-पुरुषांना असलेल्या श्रमप्रतिष्ठेच्या भानाला वर उल्लेखीलेल्या सामाजिक चळवळीने अधिकच समताधिष्ठित केले. औरंगजेबाच्या दक्षिणेतील आक्रमणानंतर हैद्राबाद वगळता सगळीच बहामनी राज्ये नष्ट झाली. परंतु मराठी भाषिक राष्ट्रवादाचा आधार घेत महाराष्ट्रातील सर्व धर्मांतील शूद्रातिशूद्र स्त्री-पुरुषांनी त्याला सत्तावीस वर्षे महाराष्ट्रात जखडून ठेवले. त्याचा आधार हा विद्रोह होता.

बाराव्या शतकापासून सतराव्या शतकापर्यंत जवळपास पाचशे वर्षं चाललेल्या सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक, आध्यात्मिक घुसळणुकीतून प्रस्थापित होत चाललेला सर्वांगीण समतेचा मुद्दा औरंगजेबाच्या मृत्यूनंतर मराठ्यांचा राजा म्हणून सत्तेवर आलेल्या राजारामाच्या धोरणामुळे खंडित झाला. छत्रपती शिवाजी महाराजांनी नष्ट केलेल्या वतनदाऱ्या राजारामांनी पुन्हा बहाल केल्या. पेशवाईने ही खंडित झालेली परंपरा प्रतिक्रांतीत बदलली. त्यामुळे स्त्री शूद्रातिशूद्र हे सर्वप्रकारच्या सत्तेपासून अलग पडले. ॲलियनेट झाले.

नव्याने प्रस्थापित झालेल्या वतनदारांमध्ये स्वतःचे श्रेष्ठत्व प्रस्थापित करण्यासाठी जे शह काटशहाचं राजकारण संपूर्ण अठरावे शतकभर चाललं. त्यांनी एकिकडे स्त्री शूद्रातिशूद्र अधिकाधिक अलग पडत गेले तर दुसरीकडे उच्चवर्णियांनी स्वतःचे वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी आर्थिक, सामाजिक विषमतेचे नियम अधिकाधिक क्रूरपणे राबवत, सर्व बाजूने जनतेची लुट सुरू केली. या प्रक्रियेत भागवतधर्माच्या नावाने समतेची पताका खांद्यावर घेऊन

पंढरपूरला निघालेल्या वारकऱ्यांची वारी हाच उपचार उरला. परंतु प्रत्यक्ष सामाजिक जीवनामध्ये नातेसंबंधांची उतरंड अधिक असमान झाली व या उतरंडीच्या सगळ्यात शेवटच्या पायरीवर कमीअधिक फरकाने सर्व जातींतल्या स्त्रिया फेकल्या गेल्या. अर्थात त्यातही ज्या स्त्रियांचे श्रम उत्पादनासाठी आवश्यक होते, त्या आपल्या श्रमाच्या सहभागाच्या आधाराने आपली ओळख टिकवून ठेवू शकल्या; पण उच्चवर्णातल्या स्त्रिया मात्र पूर्णपणे चेहराविहीन झाल्या.

१७५७ ला ब्रिटिशांनी बंगालमधील प्लासी येथे बंगालचा नवाब सिराज उद्दोला याचा पराभव करून भारतीय उपखंडात राज्यसत्ता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न सुरू केला. १७५७ ते १८१८ या काळात ब्रिटिशांनी संपूर्ण भारतीय उपखंडात (भारत, पाकिस्तान, बांग्लादेश, श्रीलंका, मालदिव, अंदमान व निकोबार बेट) इ० आपली सत्ता प्रस्थापित केली. भारताच्या ऐतिहासिक परंपरेप्रमाणे आर्य, हुन शक, कुशान, ग्रीक, अफगाण, तुर्क, मोगल इ० लोक ज्या-ज्या वेळेला भारतामध्ये आले त्या-त्या वेळेला इथल्या उच्चवर्णीय त्रिवर्णांनी त्यांना प्रस्थापित करण्यात मदतच केली. इंग्रजांपूर्वी आलेल्या व वर उल्लेखिलेल्या जवळपास सगळ्या टोळ्या या पशुपालक व भटक्या होत्या. त्या लढाईत जास्त तरबेज असल्या तरी त्यांच्यातील बहुसंख्याकांना शेती माहीत नव्हती. याउलट भारतामध्ये सिंध-पंजाबपासून ते गंगा, यमुना, ब्रह्मपुत्रेपर्यंत गाळाने भरलेली अत्यंत सुपीक मैदाने होती. या मैदानात होणाऱ्या शेतीच्या आधाराने उभी राहिलेली अत्यंत प्रगत वरकडमूल्य संपत्ती तयार करणारी सामाजिकरचना होती. या संचित संपत्तीच्या मोहाने त्या अनेक टोळ्या इथे येत राहिल्या. सुरुवातीला लुटालुट करून, पण नंतर सामाजिकदृष्टया मागासलेल्या असल्यामुळे त्या इथल्या व्यवस्थेमध्ये समाविष्ट होत राहिल्या. त्यांनी आणलेल्या नव्या-नव्या पिकांमुळे (टरबुज, खजूर इ०) इथली शेती अधिकच समृद्ध होत राहिली. त्यांनी आणलेल्या तंत्रज्ञान कौशल्यामुळे इथल्या जातिव्यवस्थेमध्ये नवे-नवे विभाग तयार होत राहिले. जातींच्या संख्येत भर पडत राहिली. (उदा० बाबराने पहिल्यांदा 'तोफ' नावाची गोष्ट भारतामध्ये आणली तोपर्यंत 'गोलंदाज' नावाची जात भारतामध्ये नव्हती.) युरोपियन हे स्थिर समाजातून आलेले होते. अठराव्या शतकात जेव्हा त्यांनी भारतीय उपखंडात आपली सत्ता प्रस्थापित करायला सुरुवात केली, तेव्हा युरोपमध्ये संरजामशाहीला पराभूत करत भांडवलशाही नावाची नवी व्यवस्था प्रस्थापित होऊ लागली होती. संपत्तीच्या मोहाने युरोपियनांच्या पूर्वी आलेल्या टोळ्यांनी जी काय लुटालूट केली ती लूट घेऊन ते इथेच स्थायिक झाले व नंतरच्या काळात त्यांनी येथील संपत्ती वाढवण्यात आपला हातभार लावला. परंतु भारतामधील संचित संपत्तीचा विकास हा व्यापारी भांडवलाच्या पलीकडे झाला नव्हता. इंग्रजांनी वर उल्लेखिल्याप्रमाणे अठराव्या शतकातील सामाजिक व राजकीय अराजकचा फायदा घेऊन प्रथम इथला व्यापार ताब्यात घेतला व त्या जोरावर १९ व्या शतकाच्या सुरुवातीला राजकीय सत्ता प्रस्थापित केली. ब्रिटिशांनी भारतातून लुटून नेलेल्या संपत्तीचे इंग्लंडमध्ये औद्योगिक भांडवलात रूपांतर केले गेले. भारतीय उपखंडाच्या उर्वरित आशिया खंडाच्या आफ्रिका व दोन्ही अमेरिका खंडात युरोपियन लोकांनी केलेल्या लुटीमुळेच युरोपात औद्योगिक भांडवलाने युरोपमध्ये अठराव्या शतकात औद्योगिक क्रांतीला जन्म दिला. युरोपमध्ये व जगामध्ये यंत्रयुगाला जन्म दिला. यामध्ये भारतातून लुटून नेलेल्या संपत्तीचा हिस्सा सगळ्यात मोठा होता.

उत्पादनाची प्रक्रिया यांत्रिक झाल्याबरोबर भारतातली शेती ब्रिटिशांच्या इंग्लंडमधील कारखान्यांना कच्च्यामालाची पुरवठा करणारी बाजारपेठ बनवण्यात आली. १८ व्या शतकापासून सुरू झालेल्या शेतीचं बाजारपेठीकरण करण्याच्या प्रक्रियेचा इथल्या उत्पादनव्यवस्थेवर व त्या उत्पादनव्यवस्थेच्या आधाराने उभ्या असलेल्या सामाजिकव्यवस्थेवर आणि व्यवस्थेचा भाग असलेल्या नातेसंबंधांवर गंभीर परिणाम होऊ लागले.

इंग्रजी सत्तेत कनिष्ठ पातळीवर सहभागी करून घेण्यासाठी भारतात इंग्रजांनी इंग्रजी शिक्षणाची सुरुवात केली. इंग्रजी चवीचे भारतीय तयार करणे, हा इंग्रजी शिक्षणाचा उद्देश होता. इंग्रजांनी आणलेल्या प्रशासन व्यवस्थेमध्ये आपलं कुलकर्णी पद अथवा देशमुखी गमावलेल्या, परंतु साक्षर असलेल्या उच्चवर्णियांना याचा मोठ्याप्रमाणात लाभ मिळाला. इंग्रजी साक्षर होऊन या उच्चवर्णियांपैकी मोठा घटक शिक्षक, कारकून, कनिष्ठ अधिकारी, कनिष्ठ पातळीवरील मॅजिस्ट्रेट, वकील आदीं पदावर जाऊन बसला. त्यांनी इंग्रजांचे अनुकरण करत या देशातील विज्ञान, तंत्रज्ञान, धर्म, सामाजिक नीतिनियम, सांस्कृतिक वारसा नाकारत जे जे इंग्रजी ते ते बरोबर अशी भूमिका घेतली. इंग्रजी साक्षर झालेल्या एका गटाने या विरोधात टोकाची भूमिका घेऊन तुम्ही जेते तसे आम्हीही जेते. तुमच्याप्रमाणे आम्हीही आर्य असं म्हणत ब्राह्मणी राष्ट्रवादाने हिंदुस्थान, आर्यावर्त, भारतवर्ष इ० नावाने मिथके उभी करायला सुरुवात केली. या वर्गातील पहिल्या घटकाने उच्चवर्णीय स्त्रियांचे स्त्री सुधारणांच्या नावाने 'मडमीकरण' सुरू केले. तर दुसऱ्या घटकाने आमची संस्कृती श्रेष्ठ आहे, अशी हाकाटी करत स्त्रियांची गुलामगिरी अधिकच घट्ट करण्याचा उद्योग सुरू केला. ज्ञानकोशकार केतकरांनी 'ब्राह्मण कन्या' नावाची कादंबरी लिहून उच्चवर्णातील इंग्रजांचे दलाल बनलेल्या या वर्गाचे ढोंग उघडे पाडले. तर जोतिबा फुल्यांनी बालविधवा, अनाथ उच्चवर्णीय स्त्रिया व त्यांच्यावर होणाऱ्या अत्याचारामुळे जन्माला येणाऱ्या त्यांच्या अपत्यांसाठी अनाथश्रम काढून वाचा फोडली. या सगळ्याचा एकत्रित परिणाम म्हणून का होईना, पण उच्चवर्णीय साक्षरांमध्ये स्त्री-पुरुष समतेची चर्चा सुरू झाली. पेशवाईपासूनच्या काळात अधिकाधिक बाजारू होत गेलेल्या व्यवस्थेमुळे तोपर्यंत पितृसत्ताक असलेल्या पुरुषकेंद्रित कुटुंबसंस्थेला तडे जायला सुरुवात झाली. स्त्रिया पुरुषांकडून एकपत्नीव्रती असण्याची अपेक्षा करू लागल्या. वाल्मिकी रामायणातला एकपत्नीव्रती 'राम' अधिकाधिक ठळक होऊ लागला. स्त्री-पुरुषांच्या नातेसंबंधात संमतीवयाचा आग्रह, जरठ-बालविवाह विरोध, स्त्री-पुरुष नात्यांमध्ये प्रेमाची अपेक्षा इ० गोष्टी उच्चवर्णियांमध्ये बाजीराव पेशव्यानंतर प्रथमच चर्चाविश्वाचा भाग होऊ लागल्या.

शूद्रातिशूद्र उत्पादक जातींतील नातेसंबंधांवर मात्र नेमका उलटा परिणाम होऊ लागला. इंग्रजांच्या प्रशासन व्यवस्थेमुळे बेरोजगार झालेल्या महार जातींसारख्या जातींतील पुरुषांना रेल्वे, गोदी, रस्ता बांधणी, कापडगिरण्या व महार पलटणीत सामावून घेतले गेले. परंतु महार स्त्रियांची स्थिती अधिकाधिक दयनीय होत गेली. खेड्यांमध्ये दारिद्र्य होतं, सामाजिक विषमता होती, परंतु त्या त्या जातीजातींतील-बहुजन समाजातील स्त्री-पुरुषांच्या नात्यांमध्ये सापेक्षत: समानता होती. ब्रिटिश भांडवलशाहीचा भाग बनताना वरील उद्योगांमध्ये समाविष्ट झालेल्या वतनदारांच्या वेतनदार झालेल्या स्त्रिया या पूर्णपणे पुरुषांवर अवलंबित झाल्या. शेती बाजारपेठेशी जोडली गेल्यामुळे व पीकपद्धत औद्योगिकपूरक झाल्यामुळे वारंवार पडणारे दुष्काळ यांमुळे महारांनंतर गिरणीकामगार म्हणून, हमाल-माथाडी म्हणून शहरात स्थलांतरित झालेली दुसरी जात ही कुणब्याची होती. शेतीपासून तुटल्यानंतर शहरातील वेतनदार कुणब्याची बायकोदेखील नवऱ्यावर पूर्णपणे अवलंबून राहू लागली. क्रमाक्रमाने स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्यानंतरच्या काळात विकसित झालेल्या बहुजन समाजातल्या कुटुंबामध्ये त्यांना तोपर्यंत फारशी प्रभावित नसलेली पितृसत्ताक पद्धती प्रभावी होऊ लागली.

दुसऱ्या महायुद्धानंतर शहरीकरणाचा वेग वाढला, कापड गिरण्यांसोबत इतरही उद्योग उदा० इंजिनिअरिंग, रबर, प्लास्टिक, रसायन, पेट्रोकेमिकल इ० औद्योगिक क्षेत्राच्या विकासाने एकीकडे शहराचा विस्तार व दुसरीकडे खेड्यांचे शहरीकरण, अशा दोन्ही प्रक्रिया १९६० नंतरच्या काळात वेगाने पुढे सरकल्या. परिणामी सुरुवातीला कापडधंद्यापुरते मर्यादित असलेले पारंपरिक कापडधंद्यातील जातींचे उध्वस्तीकरण व आपापल्या धंद्यातून बेदखलीकरण सर्वव्यापी झाले. सर्व उत्पादक जातींना

स्पर्श करू लागले. नातेसंबंधांवर या सगळ्यांचा गंभीर परिणाम होऊ लागला. बापाची एकमेव नोकरी व वयात आलेली मुलंदेखील त्याच्यावर अवलंबून. ही अवलंबून असलेली मुलंच बापाला ओझं वाटायला लागली. एकीकडे बेकार तरुण आपापल्या कुटुंबात ओझं झालेली असताना दुसरीकडे बहुजन समाजातील शिकलेल्या मुलांच्या लग्नाच्या बाजारात हुंड्याच्या नावाने किंमती ठरू लागल्या. विसाव्या शतकाच्या पूर्वार्धापर्यंत हुंडा ही संपत्तिधारक उच्चवर्णियांतली पद्धत होती. हरितक्रांतीनंतरच्या काळात बहुजन समाजातल्या आहे-रे वर्गामध्ये हुंड्याची पद्धत रुजू लागली. म्हणजेच स्त्री-पुरुषांच्या वस्तुकरणाची प्रक्रिया सुरू झाली. या वस्तुकरणाच्या प्रक्रियेत सापडलेल्या उच्चवर्णीय स्त्रियांच्या स्थितीचे वर्णन विभावरी शिरुरकर उर्फ मालतीबाई बेडेकर यांच्या 'कळ्यांचे निःश्वास'सारख्या कथांमधून आलेले आहे. तर कुटुंबात ओझं ठरलेल्या व ओझं असण्याच्या अपराधबोधापायी नाक्यावर उभं राहणाऱ्या तरुणांच्या कथा भाऊ पाध्यांच्या 'राडा'सारख्या कादंबरीमधून आलेले आहे. नाक्यावर राडा करणाऱ्या तरुणांच्या डोक्यात व्यवस्थेच्या विरोधातील आक्रोश महाराष्ट्रातील आणि देशातील स्वत:ला परिवर्तनवादी म्हणवणाऱ्या कम्युनिस्ट व समाजवादाच्या ब्राह्मणी नेतृत्वाला समजला नाही. परिणामी या आक्रोशाचं रुपांतर कष्टकरी आपआपसात लढवणाऱ्या उजव्या संघटनामध्ये झाली. अनेक स्त्रिया या उजव्या संघटनाच्या नेतृत्वत येऊन स्त्रियांची गळचेपी करणाऱ्या उच्चवर्णीय संस्कृतीलाच आदर्श भारतीय संस्कृती आहे असं म्हणू लागले. १९७५ नंतरच्या काळात कुटुंबसंस्थेचा ऱ्हास वेगाने सुरू झाला. गणपती व नवरात्रात रात्रभर फिरणाऱ्या किशोरवयीन तरुण मुलामुलींची टोळकी बदललेल्या सामाजिक मूल्यांचे प्रतीक आहे.

१९९० नंतरच्या काळात उदारीकरण, खासगीकरण व जागतिकीकरणाच्या नावाखाली सरकारने 'कल्याणकारी राज्य' ही संकल्पना सोडून दिली व शिक्षण, आरोग्य, घरबांधणी, रस्ते, पाणी-व्यवस्थापन, बियाणे इत्यादी बाबतची आपली जबाबदारी पूर्णपणे नाकारून त्याचे पूर्णपणे व्यापारीकरण केले. याच काळात तंत्रज्ञानात झालेल्या प्रचंड विकासाने शेती व औद्योगिक अशा सर्वप्रकारच्या उत्पादनातून मानवी श्रम हद्दपार करण्याची प्रक्रिया अधिकाधिक गतिमान केली. परिणामी शहरांच्या विस्तारासोबतच खेड्यांचं शहरीकरण व यांत्रिकीकरण अधिक सर्वव्यापी केले. उत्पादनप्रक्रियेपासून अलगाव झालेल्या उत्पादक-जातींतील स्त्री-पुरुषांचे एकीकडे 'व्यक्तिमत्त्व विकासा'च्या नावाचे बाजारी सादरीकरण होऊ लागले. या सादरीकरणाने सौंदर्यप्रसाधनं, साबण इत्यादींची बाजारपेठ मोठ्या प्रमाणात विस्तारली. इंग्रजी भाषेची बाजारपेठही प्रचंड प्रमाणात विस्तारली. साहजिकच इंग्रजी न येणारा मोठा वर्ग न्यूनगंडात ढकलला जाऊ लागला. हा न्यूनगंडात ढकलला गेलेला वर्ग टीव्हीवर दिसणाऱ्या प्रत्येक गोष्टीची व्यक्तिमत्त्व विकासाच्या नावाने नक्कल करतो आहे. ही नक्कल करता करताच स्त्रियांवरील बलात्कारांचं प्रमाणही वाढत आहे. मध्यमजातीतील विशेषत: जाट, गुज्जर, मराठा, रजपूत इत्यादी जातींमध्ये स्वत:ची प्रतिष्ठा टिकवण्यासाठी ऑनरकिलींगचे प्रकार वाढत चाललेले आहेत. या संपूर्ण प्रक्रियेमध्ये लग्नसंस्था, कुटुंबसंस्था या शेतीकेंद्रित उत्पादनव्यवस्थेने निर्माण केलेल्या सामाजिकसंस्थांचा भौतिक पाया दिवसागणिक खचत चाललेला आहे. संपूर्ण भारतीय समाजासमोर येणाऱ्या व्यवस्थेमध्ये नातेसंबंधाचे स्वरूप काय असेल, हा प्रश्न आ वासून उभा आहे.

■

सी-१३, कुणाल प्लाझा,
स्टेशन रोड, चिंचवड (पू.),
पुणे ४११ ०१९

‘सगुणा’ने आयोजित केलेल्या राज्यस्तरीय निबंधस्पर्धेतील प्रथम, द्वितीय, तृतीय (विभागून) आणि उत्तेजनार्थ असे एकंदर पाच निबंध या अंकात क्रमाने प्रकाशित करत आहोत.

- संपादक

सगुणा

निबंध-१

# शेती आधारित **उत्पादनव्यवस्थेची** आजची परिस्थिती

*मेरे देश की धरती*
*सोना उगले*
*उगले हिरे मोती*
*मेरे देश की धरती*

धरीत्रीच्या कुशीमधून धान्याच्या स्वरूपात सोने-हिरे-मोती उगवतात. ज्याच्यामुळे मानवाची अन्न ही मूलभूत गरज भागते. ही गरज भागवणारा शेतकरी देशाची शान-मान-जान आणि स्वाभिमान आहे. भारत हा कृषिप्रधान देश आहे. भारतातील ८०% लोक ग्रामीण भागात राहतात. एकूण लोकसंख्येपैकी ६५% लोकांचा शेती हाच प्रमुख व्यवसाय आहे. आजचे युग हे विज्ञानयुग म्हणून ओळखले जाते. या विज्ञानाच्या जोरावर नवनवीन तंत्रज्ञान, कृषिसंस्था, कृषी सेवा केंद्र, कृषी विद्यापीठ, कृषी संशोधन केंद्र यांचा उपयोग करून शेतकरी राजाने विक्रमी पद्धतीने भरघोस उत्पादन घेतले आहे. आणि आम्हीही या विज्ञानयुगामध्ये कमी नाही हे दाखवून दिले आहे. कोणत्याही राष्ट्राचे भवितव्य हे त्या राष्ट्रातील, देशातील कृषी धोरणांवर अवलंबून असते. म्हणूनच ग० दि० माडगूळकर म्हणतात -

*एक सूर, एक ताल, एक गाऊ विजयगान*
*जय जवान, जय किसान!*

**चित्रा चौगुले**

*अखिल देश पाठीशी, 'जवान व्हा' रणी चला*
*किसान होऊनी कसा, भूमी सस्य श्यामला*
*यौवनास योग्य रे, शौर्य आणि स्वाभिमान*
*जय जवान, जय किसान!*

अशाप्रकारे आपल्या देशाचे रक्षण करणारे जवान व देशासाठी आयुष्याच्या शिदोरीची सोय करणारा किसान यांचे गौरवगीत गाऊन जवान व किसान म्हणजे शेतकऱ्यांचा जयजयकार इथे केलेला आहे. आयुष्यभर शेतात कष्ट करून, राब राब राबून जनतेच्या अन्नाची गरज भागवण्याचा प्रयत्न करणारा शेतकरी हाच समाजाचा अन्नदाता, जीवनदाता होय. जर एखाद्या राष्ट्राचा विकास व्हायचा असेल तर त्या राष्ट्राची शेती समृद्ध असणे गरजेचे आहे. ज्या देशातील शेतकऱ्यांमध्ये अन्न, वस्त्र, निवारा यांसारख्या मूलभूत गरजा भागवण्याची क्षमता असते, त्या देशातील जनसंपत्तीही समृद्ध असते. पण जो शेतकरीराजा स्वत:चे दु:ख विसरून इतरांना सुख देतो, भरघोस अन्न देतो, अशा शेतकरीराजाची आजची अवस्था वैफल्यग्रस्त आहे. शेतकरी सुखी असेल तरच राष्ट्र सुखी, समृद्ध होईल. ज्या वेळेला दुष्काळ पडतो पाण्याची टंचाई भासते, पाण्यासाठी वणवण फिरावे लागते, अशा वेळी -

*पाऊस पडला तर, शेती पिकेल,*
*शेती पिकली तर, शेतकरी टिकेल,*
*अन् शेतकरी टिकला तर, जग टिकेल,*
*पण पाऊस नाही पडला तर, शेती विटेल*
*शेती विटली तर, शेतकरी मिटेल*
*अन् शेतकरी मिटला तर जग मिटेल.*

कारण शेतकरी हाच खरा नायक आहे. शेतामध्ये काय पिकवलं पाहिजे? कसं पिकवलं पाहिजे? आणि कसं टिकवलं पाहिजे हे फक्त शेतकरी राजाच जाणू शकतो. भारत हा खेड्यांचा देश म्हणून ओळखला जातो. प्राचीन काळापासून या देशातील जनतेचा व्यवसाय शेती हाच आहे. शेतकऱ्यांच्या उत्पन्नाला योग्य दर प्राप्त झाला तरच शेतकरी राजाच्या ओठावर हसू फुटणार आहे. खरंतर शेतकरी हाच या देशाचा मालक असावयास हवा. पण आज भांडवलदारीमुळे उत्तम नोकरी, मध्यम व्यापार व कनिष्ठ शेती हे धोरण मानले जाऊ लागले आहे. शेतीचा उत्पादन खर्च जास्त आणि नफा मात्र काहीच नाही, असं त्रांगडं शेतकऱ्यांच्या मानगुटावर बसलेलं आहे. ऊस, कापूस, कांदा, लसूण, डाळींब, सफरचंद यांचे भाव बघितले तर खऱ्याअर्थानं कष्ट करणारा, शेतामध्ये राबणारा शेतकरी आहे तसाच राहतो आणि याचा लाभ मात्र व्यापारी-विक्रेता वर्ग उठवतो. शेतकरी राजाच्या डोक्यावर कर्जाचा बोजा उभा राहतो. यातून मग शेतकऱ्यांच्या मुलांचे भविष्य घडणार काय? अशा स्थितीत हतबल शेतकरी राजा आपल्या मुलाला म्हणतो -

*आरं किती राबायचं लेका,*
*सरकार सोडत नाही आपला ठेका,*
*करतं सगळ्यांच्यावर कर्जाचा फेका,*
*आणि नंतर म्हणतं शेतं विका*
*कर्जाचा तो भडीमारा*
*सोसत नाही आता शेतसारा*
*म्हणून म्हणतो आता,*
*पहिल्यासारखं हुत नाय पोरा*
*आता गळफास लावलेला बरा...*

या कर्जाच्या बोजाने कांदा, कापूस, ऊस, बटाटा विकणाऱ्या शेतकऱ्याचा मुलगा एमबीबीएस, बीएचएमएस, बीई या क्षेत्रांमध्ये जाऊन शिक्षण घेणार काय? आज शेतकऱ्यांच्या वाढत जाणाऱ्या आत्महत्या हाच आज चिंतेचा आणि चिंतनाचा विषय आपल्यासमोर उभा राहिला आहे. सरकारी अधिवेशनांच्या काळामध्ये शेतकऱ्यांच्या आत्महत्यांवर केवळ 'चिंतन'च केले जाते. हा प्रश्न अधिवेशनात गाजत राहतो. इथपर्यंतच्या बातम्या आपल्याला माहीत असतात. शेतकरी राजाचे काम कोंबडा आरवण्या अगोदर सुरू होते अन् सूर्य मावळल्यानंतरही ते संपत नाही. पण आज याच शेतकऱ्याच्या शेतीमालाची दखल घेतली जात नाही. घेतलीच तर माल कमी किंमतीमध्ये मागितला जातो. यातून मग शेतकऱ्याची

अवस्था बिकट होते. मिळणारे उत्पन्न १५ हजाराचे असेल तर त्यावर होणारा खर्च २० हजार रुपये असतो. मग तो शेतकरी स्वत:चा व आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह कसा चालवणार? यांसारखे बरेचसे प्रश्न अनुत्तरीत आहेत. शेतकरी हा देशाचा अन्नदाता मानला जातो, तेव्हा शेतकरीच व्यवस्थित नसेल तर तो इतरांच्या गरजा भागवू शकेल काय? शीतपेयाची एक बाटली घेण्यासाठी आपण वीस-पंचवीस रुपये मोजतो, पण बाजारात दोन-तीन रुपयांच्या भाजीसाठी आपण घासाघीस करतो, ही आपली मानसिकता बदलली पाहिजे. आपल्या देशाचा व शेतकरी राजाचा विकास शेतीवरच अवलंबून आहे. सरकारने अनेक धोरणे आखलीत. शेतकऱ्यांच्या विकासासाठी वेगवेगळ्या योजना, वेगवेगळ्या फंडातून आणल्या जातात. कृषी बँका, जिल्हा परिषद, पंचायत समिती यांच्यामार्फत अनुदान स्वरूपात शेतीपंप, विहिरी तसेच वेगवेगळ्या कामांसाठी, शेतकऱ्यांच्या समस्या सोडवण्यासाठी कर्जे दिली जातात. पण ही कर्जे, अनुदाने स्वत:च्या खिशात घालणारे महाभागही आपल्या राज्यामध्ये आहेत.

अशी अवस्था या जगात झालेली आहे. आता मागून मिळवण्यासारखे काही राहिले नाही. त्यासाठी पैसा असणे गरजेचे आहे. जे स्वत:चा विकास करू शकत नाहीत ते राष्ट्राचा विकास काय करणार? शेतकऱ्यांचीही ध्येयधोरणे सर्वांगीण विकास साधायचा असेल तर सर्व योजना शेतकऱ्यांपर्यंत पोहोचतील, याची दखल घेतली पाहिजे. तरच राष्ट्र समृद्ध बनेल व शेतकरी राजा विकासाच्या दृष्टीने सर्वोच्च शिखर गाठेल अन् पूर्ण जगताचा खरा नायक म्हणून तो ओळखला जाईल.

आज आपल्या देशात शेतकऱ्यांच्या मूळ प्रश्नांना हात न लावता सगळे जण मलमपट्ट्या लावण्याच्या प्रयत्नात असल्याने व काही वर्तमानपत्रे त्याला अवास्तव प्रसिद्धी देत असल्याने शेतकऱ्यांच्या तसेच शेताविषयीच्या खऱ्या प्रश्नांकडे दुर्लक्षच होते. गेली चाळीस वर्षे हा लपंडावाचा खेळ चालू आहे आणि त्यामुळेच आज शेतकऱ्यांना आत्महत्येचा मार्ग धरावा लागत आहे.

प्रगत देश विकसनशील देशांना त्यांचे बाजार खुले करण्यासाठी दमदाटी करत आहेत. सोवियत युनियनचे जे झाले तेच आता या प्रगत देशांत लवकरच होणार आहे. म्हणून या देशातील अर्थव्यवस्थेचा आदर्श घेऊन आपल्या देशातील अर्थव्यवस्था तयार करण्याची आवश्यकता नाही. तरीदेखील अर्थशास्त्रज्ञ, राजकारणी लोकांची दिशाभूल करून आपले हित साधत आहेत. म्हणून या जगात इमानदार माणसाला काहीच किंमत उरलेली नाही. म्हणून म्हणावसं वाटतं-

*इनामदार माणसाला जगात आज बरकत नाही.*
*वजन लावल्याशिवाय कागद पुढे सरकत नाही.*
*पैसा पेरीत जाईल त्याला कोठेही हरकत नाही.*
*दोन हस्त व एक मस्तक देवालाही भावत नाही.*
*नैवेद्याशिवाय देवही आता नवसाला पावत नाही.*

याच प्रकारे शेतकरी राजासाठी व शेतीसाठी येणारी अनुदाने लाटली जातात. आज आपल्या देशांमध्ये शेतांचे व शेतकऱ्यांचे नियोजन नसल्यामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचा प्रश्न उभा राहिला आहे. आपल्या देशामध्ये पंचवार्षिक योजना आखून शेतकऱ्यांचा सर्वांगीन विकास साधण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न केला जातो. शेतकरी हा अर्थव्यवस्थेचा कणा मानून आपण हरितक्रांती घडवून आणली. पंजाब, हरियाणा या राज्यांमध्ये हरितक्रांतीचे यशस्वी प्रयोग झाले. तसे ते इतर राज्यांतही घडवून आणले तर शेतकरी राजा नक्कीच सुखी होईल.

काही ठिकाणी पाण्याचे योग्य नियोजन म्हणून उत्पादन चांगले होते, तर काही ठिकाणी शेती आहे, पण पाण्याची सुविधा नाही. काही ठिकाणी पाणी आहे, पण लाईट नाही. अशा समस्या शेतकऱ्यांच्या समोर आहेत. त्यामुळे शेतीउत्पादनावर त्याचा वाईट परिणाम होतो.

*शेतकऱ्यांना मोफत वीज,*
*निवडणुकीत वायदा झाला.*
*लोडशेडींगच्या फटक्या खाली फक्त,*

*नऊ महिनेच फायदा झाला.*
*अहो! निवडणुका जवळ आल्यावर,*
*मंत्र्यांनी असं बोलायचं असतं.*
*असं म्हणून सरकारच आता*
*कादा पाळत नाही.*
*ऐक भावा खरं सांगतो,*
*मागून काय मिळत नाही.*

'बनावट कंपन्या' वेगवेगळी आमिषे दाखवून आपापली उत्पादने शेतकऱ्यांसमोर विक्रीला आणतात. बोगस बी-बियाणे, औषधे, पंप, खते यांसारख्या वेगवेगळ्या प्रकारांमध्ये शेतकऱ्यांना फसवलं जातं. निरक्षर शेतकऱ्यांची फसवणूक केली जाते. त्यामुळे त्यांची प्रगती होत नाही. आर्थिकदृष्ट्या शेतकरी दुर्बलच राहतात. मग काढलेली कर्जे भागवता येत नाहीत. हप्ते चुकल्यामुळे नुसते व्याजच भरत बसतात. मुद्दल जसेच्या तसे शिल्लक राहते. त्या वेळी गावातील आपली प्रतिष्ठा जाऊ नये, यासाठी ते आत्महत्या करतात. मग त्यांची जन्माला येणारी मुलं म्हणतात -

*कर्जात जन्मलो आम्ही,*
*कर्जात नदीवर जावू.*
*जमिनीवरच्या कर्जाला,*
*स्वर्गातून जामीन देवू.*
*कर्जात जन्मली आई,*
*कर्जात जन्मला बाप.*
*हा कोण भिकारी म्हणतो,*
*कर्जास वाढते पाप...*

दोन वर्षांपूर्वी आपल्या देशामध्ये दुष्काळ पडला. या दुष्काळामध्ये शेतकऱ्यांचे भरपूर नुकसान झाले. काहींनी आत्महत्या केली. एका व्यक्तीवर अवलंबून असणारी कुटुंबे उद्ध्वस्त झाली. गेल्या पाच वर्षांमध्ये जवळजवळ २३७३ शेतकऱ्यांच्या आत्महत्येची नोंद झाली आहे. या आत्महत्यांचे प्रमाण कमी करायचे असेल तर वेगवेगळ्या स्वयंसेवी संस्था, योग्य सोयीसुविधा, नियोजनाची माहिती दिली तर शेतकरी सुखी होईल व आपला अन्नदाता आपल्यासाठी नायक बनून मदत करेल.

सहकारातून समृद्धी, समृद्धीतून विकास हा मंत्र गेल्या चार दशकांपासून महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यांत पोहोचला. गाव तिथे विविध कार्यकारी सहकारी सोसायट्या निर्माण झाल्या. ग्रामीण भागातल्या उजाड माळरानावर कोट्यवधी रुपयांची उलाढाल असलेले साखर कारखाने उभे राहिले. कष्टकरी, शेतकरी कारखान्याचा मालक झाला. या सहकारक्रांतीमुळे गावागावात समृद्धीचे वारे वाहू लागले. या सहकार चळवळींशी मुख्यत: शेतकरी मोठ्याप्रमाणावर जोडले गेल्यामुळे या चळवळीला शासन मोठा हातभार लावत आहे. महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली शासनाने शेती व शेतकऱ्यांच्या हितासाठी राज्यातील ४० लाख शेतकऱ्यांच्या ६ हजार कोटी रुपयांची कर्जमाफी आणि कर्ज परतफेड योजनेची घोषणा केली. त्यामुळे शेती आणि सहकारक्षेत्र अधिक मजबूत करण्यासाठी अतिशय चांगले वातावरण निर्माण झाले आहे. आजपर्यंतच्या इतिहासातील सर्वांत मोठी कर्जमाफी देशातील शेतकऱ्यांना मिळाली. त्यामध्ये सर्वाधिक वाटा महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना मिळाला, पण जे शेतकरी या कृषी कर्जमाफी व कृषी परतफेड या योजनेपासून वंचित राहिले, त्यांना योग्य तो न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे. पहिल्यांदा राज्य शासनाने ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, कोल्हापूर, भंडारा व गोंदिया या ७ जिल्ह्यांतील ५ हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्र असलेल्या शेतकऱ्यांच्या थकीत कर्जाचे एकवेळ समझोता योजनेत अंतर्भाव नव्हता. त्यांची १४१ कोटी रुपयांची रक्कम भरली. त्यामुळे त्यांना या योजनेचा लाभ मिळाला, पण तरीही अनेक शेतकरी या कर्जापासून, या कर्जमाफीपासून वंचित राहिले आहेत. शेतकऱ्यांची जी पॅकेजेस आहेत, पण ती मधल्या मध्येच लाटली जातात. शेतकऱ्यांपर्यंत ती पोहचतच नाहीत. म्हणून माझा शेतकरी राजा म्हणतो-

*काळ्या आईच्या कुशीत केलं रक्ताचं पाणी*
*त्याची साद ऐकायला नाही तयार कुणी*
*माल त्याचाच असून होते व्यापाऱ्यांची मनमानी*

*काय पाप केलं मी न् शेतकरी होऊनी...*

कर्जाच्या भीतीने शेतकरी आत्महत्या करू लागला. शेतात न जाता घरात बसू लागला, तर आपणास सर्वांच्यावर उपासमारीची वेळ येईल. शेतकरी जगला तरच आपण जगू नाही तर यमदेव आपल्या मानगुटीवरच बसून आहे. शेतकरी हा पालक, पोषक आणि समाजाचा सूत्रधार आहे.

शेतकरीराजाला संपन्न अवस्थेकडे घेऊन जायचे असेल तर तशी ध्येय-धोरणे आपण ठरवली पाहिजेत. आज शेतीव्यवसाय करणे म्हणजे कमीपणाचे मानले जाते. शेती हा बुडवणुकीचा व्यवसाय म्हणून त्याच्याकडे बघितले जाते. शेतकऱ्यांचा उत्पादनखर्चावर जास्त खर्च होतो, पण त्याला भाव कमी येतो. त्यामुळे निराश अवस्थेतील शेतकरी, शेती विकण्यासही मागेपुढे पाहत नाही. उपासमारी व कुटुंबाच्या मूलभूत गरजाही भागवण्यासाठी त्याला दाहीदिशा अपुऱ्या पडतात. आपण शहराकडे मोठ्या संख्येने धावू लागलो. शहरी सुखात रममाण होऊ लागलो आहोत. पण ग्रामीण प्रश्नांचा, त्यांच्या समस्यांचा आपल्याशी काही संबंध उरला नाही. आमची भूमिका ही बघ्याची भूमिका असते. ही मानसिकता बदलली पाहिजे, कारण शेतीवरच आपलं जीवन अवलंबू आहे.

शेतीला जोडधंदा असणाऱ्या दुग्धव्यवसाय, पशुपालन यांसारख्या धंद्यांना प्राधान्य दिले व त्यासाठी योग्य ती मदत केली तर निश्चितच शेतकरी सुखी होईल. आज शेती व्यवसायाला योग्य ती मदत करण्याची गरज आहे तरच 'वीज आणि कर्ज' या सर्वांत जास्त भेडसवणाऱ्या समस्यांना तोंड देता येईल. पिढ्यान्‌पिढ्या यांमध्येच अडकलेले शेतकरी अजूनही मागासलेलेच आहेत. शेतकरी शेतात राबतो, कष्टतो तो आपल्या शेतीला आई मानतो, पण -

*माता आणि माती यात*
*एका वेलांटीचा फरक आहे*
*एक कुशीत घेते तर*
*दुसरी पोटात घेते...*

हा विचार सर्वांच्या मनात पेरला पाहिजे, रुजला पाहिजे. उगवण्याचं काम प्रामुख्याने शेतकरीच करतो, पण त्यासाठी शेती तशी असावी लागते. त्यासाठी त्याला फक्त जमिनीची गरज नाही. त्यासाठी बी-बियाणे खते आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे पाणी. पाण्याच्या जोरावरच आपण आजपर्यंत या पृथ्वीतलावर टिकून आहोत. पाणी म्हणजे जीवन आहे. आपल्या देशातील ६५% जनता शेती करते म्हणजे हा देश पोसण्याचं काम या शेतकरीराजाकडं आहे. कथाकथनकार आप्पासाहेब खोत म्हणतात ''माता, माती आणि माणसं यांच्याशी कुणी बेईमान राहू नका कारण तुम्ही जर बेईमान झाला तर माती माणसाला मातीत मिसळल्याशिवाय राहत नाही...''

वाढत्या नागरीकरणामुळे विदेशातील मिठापासून साखरेपर्यंत, पाण्याच्या बाटलीपासून दूधापर्यंत, अन्नधान्य, कपडे यांच्यामुळे शेतकऱ्यांपुढे बरीचशी आव्हाने उभी राहिली आहेत. पारंपरिकपद्धती व आधुनिक तंत्रज्ञान, विज्ञान यांचा योग्य समन्वय करून शेतकऱ्यांना योग्य ते मार्गदर्शन करायला हवं.

शेतीवर आधारित उत्पादनव्यवस्थेतील आजची परिस्थिती अतिशय वाईट आहे. शेतमजुरांचे जीवन तर हलाखीचे झाले आहे. त्याला त्याच्या कष्टाच्या तुलनेत अतिशय कमी मजुरी मिळते. शेतीची कामे संपली की त्याच्या वाट्याला येते ती फक्त बेकारी.

■

चित्रा युवराज चौगुले
मु० पो० मुडशिंगी, ता० हातकणंगले,
जि० कोल्हापूर
संपर्क : ९०९६५४६०८७

सगुणा

निबंध-२

# बदलती खेडी

*फुटे क्षितिज तांबडे जो न थोडे,*
*तोच जागे होतसे सर्व खेडे*

ग्रामीण जीवनाच्या दैनंदिन व्यवहाराचे चित्रण करणारी ही सुंदर कविता आठवली आणि नकळतच कालच्या खेड्याचे आजच्या खेड्याशी तुलनालनात्मक समोर आले. सुमारे ५०-७५ वर्षांपूर्वीचे ग्रामीण जीवनाचे सुरेख चित्रण. सुखाने नांदत असलेली समृद्ध कृषिसंस्कृती. सर्जनशील मातीशी त्याचे युगाचे नाते असलेला व मातीवर मनापासून प्रेम करणारा बळीराजा. 'कणभर पेरले तर मणभर उगवतेच' अशी गाढ श्रद्धा असलेला. बारा बलुतेदारासह विविध लोककलांना आश्रय देणारा. 'अतिथी देवो भव' म्हणून कांदा-भाकरीची मेजवानी देणारी ग्रामीण संस्कृती पशुधनाचाही आदर करणारी आहे.

विसाव्या शतकापर्यंत तरी यांमध्ये फारसे बदल नव्हते. मुलाचे आयुष्य आजे, पणजे यांच्यापेक्षा वेगळे नसते. जीवनशैलीत काडीमात्र फरक न होता मुलाचीही जीवनशैली तशीच, हे ठरलेले असे. परंपरागत व्यवसाय पिढ्यान्‌पिढ्या सुरूच असत. काही महत्त्वाची शहरे-गावे सोडल्यास इतर गावांतील आयुष्य ५०-६० वर्षांपूर्वीपर्यंत मध्ययुगीन कालीन असल्याप्रमाणेच होते. जिकिरीचा वेळ खाऊ प्रवास, दळणवळणाची साधने नाहीत.

**श्रीमती मंगला गोविंद पोळ**

शिक्षणाची मारामार, अंधश्रद्धा, देवभोळेपणा, दु:ख, दैन्य, दुर्दैव यांमध्येच ग्रामीण जनता भरडलेली आहे. बहुसंख्य कुटुंबे पंचक्रोशीबाहेर न जाता गावातच आयुष्य काढणारी होती.

एकविसाव्या शतकात अनेक भौतिक बदल झाले. बदलांचा हा झंझावात अगदी दूर असलेल्या वाड्या-वस्तीपर्यंत पोहोचला. साक्षरता वाढली, दळणवळणाची साधने वाढली. प्रसारमाध्यमांचा प्रचंड विस्फोट झाला. गेल्या २५ वर्षांत टेलिफोनचे जाळे प्रचंड विस्तारले. भ्रमण दूरध्वनीमुळे संवाद होणे सहज शक्य झाले. आज अगदी सामान्यातली सामान्य व्यक्ती या सुविधांचा वापर करताना दिसत आहेत. दूरदर्शनवरील उपग्रह वाहिनीसोबत खासगी वाहिन्यांनी घरोघरी दूरदर्शन संचाच्या माध्यमातून प्रवेश केला. आता संगणक व त्याच्या अनुषंगाने येणाऱ्या सुविधा धडकत आहेत.

औद्योगिकक्रांतीने मानव समूहाला शेतीसंस्कृतीतून खेचून नव्या संस्कृतीत आणले. पूर्ण शेती यंत्राच्या साहाय्याने होऊ लागली. मळणीयंत्रामुळे सुगीसाठी लागणाऱ्या खळ्याचे दिवस सरले. शिवारातून घुमणारे भलरीचे सुर हरवले. कृषिसंस्कृतीचे वैभवशाली अंगच नाहीसे झाले. विज्ञान, तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे साधनसामुग्री वापराच्या पारंपरिकपद्धतीमध्ये होणारे बदल स्वीकारले जात आहेत. आजही शेती हाच ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा वा केंद्रबिंदू मानून आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने शेतीमध्ये अभिनव प्रयोग केले जात आहेत. यामुळे पारंपरिक शेतीमध्ये अडकून न पडता नगदीपिके घेण्याकडे कल वाढतो आहे. शेतीच्या अभ्यासासाठी शेतकऱ्यांचे गट परदेशात जात आहेत. काही ठिकाणी इस्त्रायल शेतींचे प्रयोग केले जात आहेत. ठिबक सिंचनातून पाण्याचे सुयोग्य नियोजन करण्याची जलसाक्षरता वाढीस लागत आहे. सिंचनाच्या अनेक योजना पूर्ण झाल्याने बरेचसे क्षेत्र ओलिताखाली आल्याने गावाचा चेहरा मोहरा बदलला. शेतकऱ्यांनी शेतामध्येच बंगले, फार्म हाऊस निर्माण केले. राहणीमान, आर्थिक स्तर उंचावल्याचे हे द्योतकच

■

**शेतजमिनीला सोन्याचे भाव आले आहेत. श्रम करण्याची वृत्ती कमी झाल्याने शेती विकून नोकरी-धंद्यासाठी, शिक्षणासाठी ग्रामीण युवक स्थलांतरित होताना दिसतो. सुपीक जमिनी नष्ट होऊन निसर्गाशी झगडत पिढ्यान्‌पिढ्या शेती करणारा शेतकरी भूमिहीन होत आहे. पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे, खेडी ओस पडत आहेत. नागरीकरणाचे वारे वाहू लागल्याने गावचे गावपण हरवले आहे.**

------

आहे. महानगराच्या विळख्यात येणाऱ्या गावांनी तर मोठीच कात टाकलीय. खेड्यांच्या जुन्या खाणाखुणा पुसल्या जात आहेत. वाडा संस्कृती नामशेष झाली आहे.

सिटी बस, गाव तेथे एसटी, नद्या-ओढ्यांवरील छोटेमोठे पुल, द्रुतगती महामार्ग, रेल्वेमार्ग यांसारख्या अंतर्गत दळणवळणाच्या सुविधेमुळे गावे जोडली गेली. अगदी खुर्द-बुद्रूक एक झाले. शेतीमाल, दूध वाहतुकीचे प्रमाण वाढले. बैलगाडी, सायकल हद्दपार होऊन ट्रॅक्टर, मोटारसायकल, जवळच्या प्रवासी वाहतुकीसाठी सिक्ससिटर, रिक्षा यांसारख्या वाहन संख्येत वाढ झाली. एवढेच नाहीतर काही भागांत आलिशान कार, गाड्यांचा वापरही पाहावयास मिळतो. यासोबतच समुद्रकिनारा लाभलेली, थंड हवेची ठिकाणे यांना महत्त्व प्राप्त झाले. ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाची ठिकाणे, धार्मिक, आध्यात्मिकदृष्ट्या महत्त्वाच्या ठिकाणांना तीर्थक्षेत्राचा दर्जा प्राप्त झाल्याने यांचा समावेश पर्यटनस्थळांत झाल्याने स्थानिक लोकांना हॉटेल, वाहतूक, तिकीट आरक्षण केंद्र यांसारख्या रोजगार संधी प्राप्त झाल्या आहेत.

काळानुसार बदलणे ही सहजप्रवृत्ती असली तरी बदल दोन्ही दिशांनी होतात. काळाबरोबर चालण्याची

कला खेड्यांनीही अवगत करून घेतली आहे. परिसराची प्राकृतिक रचना, नैसर्गिक साधने, हवामान या गोष्टी गृहीत धरून काही गावांभोवती उद्योगधंद्यांचा विस्तार होत आहे. त्यामुळे शेतजमिनीला सोन्याचे भाव आले आहेत. श्रम करण्याची वृत्ती कमी झाल्याने शेती विकून नोकरी-धंद्यासाठी, शिक्षणासाठी ग्रामीण युवक स्थलांतरित होताना दिसतो. सुपीक जमिनी नष्ट होऊन निसर्गाशी झगडत पिढ्यान्‌पिढ्या शेती करणारा शेतकरी भूमिहीन होत आहे. पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे, खेडी ओस पडत आहेत. नागरीकरणाचे वारे वाहू लागल्याने गावचे गावपण हरवले आहे. साहजिकच काँक्रीटचं जंगल पसरत असून काही ठिकाणी मोठमोठे गृहप्रकल्प, वीकएण्ड होम्स्‌ची निर्मिती होत आहे. जीवनशैलीत होत असलेल्या आमूलाग्र बदलांसोबत गुन्हेगारीचे लोणही पसरू लागले आहे. विनापरवाना लॉटरी, मटका, दारुविक्री सर्रास होताना दिसते. शहरी संस्कृतीचे आक्रमण होऊन नव्या बाजारसंस्कृतीने प्रवेश केला आहे. अगदी मॉल्स नसले तरी सुपर मार्केटची संकल्पना मूळ धरत आहे.

औद्योगिकीकरण, शहरीकरण व जागतिकीकरण यांच्या रेट्यामुळे आर्थिक प्रेरणा प्रबळ झाली आहे. मानवीमूल्यांची पायमल्ली होत असली तरी 'गड्या आपुला गाव बरा' या जाणिवेने ग्रामीण भागातील अनेक उच्चविद्याविभूषित तरुण, युवक गावाच्या प्रगतीसाठी संघटित होत आहेत. अस्मानीसुलतानी संकटाला सामोरे जात असताना कर्जबाजारी शेतकरी आत्महत्या करत आहेत. शेतीला प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी, शेतमालास हमीभाव मिळवून देण्यासाठी प्रसंगी आंदोलन करीत आहेत. आधुनिक शेतीशास्त्रातील नव्या ज्ञानप्रवाहाशी समरस होऊन नव्या बदलांना सामोरे जात शेतमालाला योग्य भाव मिळून जागतिक बाजारपेठेमध्ये उत्पादन निर्यात करण्याचे प्रयत्न होत आहेत. याबरोबरच कृषिपूरक उद्योगधंदेविषयक प्रवृत्ती वाढत आहे.

'खेडी हाच विकासाचा केंद्रबिंदू असावीत' या गांधीजींच्या विचाराप्रमाणे अनेक शासकीय योजना शासन राबवत आहे. ग्रामसभेलाही काही अधिकार देण्यात आले आहेत. सामान्य जनता ही सजग होऊन माहिती अधिकार वापरत आहे. याचे अलीकडील उदाहरण म्हणजे मेळघाटातले पायविहीर गाव. या गावातील कमी शिकलेल्या मुलांनी गावाची असलेली जमीन सामुदायिक वन हक्क कायद्यानुसार घेऊन पॅकिंग ते मार्केटिंग असा सीताफळ व्यवसाय सुरू केला. तसेच हिवरे बाजार, राळेगणसिद्धी यांसारख्या गावांनी महाराष्ट्राच्या नकाशावर स्वतंत्र ओळख निर्माण करून खेडी स्वयंपूर्ण होऊ शकतात हे सिद्ध केले. नोकरी-व्यवसायानिमित्त परगावी असणाऱ्या व्यक्तीही बदलाच्या प्रवाहात समरस होऊन 'सहकारातून समृद्धीकडे' जाणाऱ्या वाटचालीत सहभागी होत आहेत. साक्षरता, आरोग्यविषयक अभियान, गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान, हागणदारीमुक्त गाव यांसारख्या योजना प्रभावीपणे राबवल्या जात आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये सुशिक्षित तरुण तसेच महिलांचाही सहभाग वाढत आहे. स्थानिक पातळीवर छोट्या पतसंस्था, सहकारी बँका, बचतगटांच्या माध्यमातून छोट्या उद्योगास चालना मिळत आहे. शासनाच्या मदतीने पाणी प्रश्न, विजेला पर्याय म्हणून सौरदिवे, सामूदायिक गोबर गॅस प्लांट, वाचनालय या सुविधा काही गावात उपलब्ध आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांवर राजकीय गटांचा प्रभाव दिसत असला तरी सहकाराची भावनाही दिसून येते.

एकूणच खेड्यावर होणारे शहरी संस्कृतीचे आक्रमण एक नवी दिशा देणारे आहे, असेच म्हणावे लागेल. खंत एवढीच की आदर्श असणारी ग्रामीण संस्कृती अनुभवण्यासाठी तिचे मॉडेल पाहावे लागते. या संस्कृतीचे जतन अमूल्य ठेव्याप्रमाणे केले तरी काळानुसार संदर्भही बदलत असतात 'उद्याच्या सुंदर विकासासाठी.'

■

श्रीमती मंगला गोविंद पोळ
गणेशनगर, करमाळा, जि० सोलापूर
संपर्क : ९४२१०६२८७३

सगुणा

निबंध-३

# हुंडा एक अनिष्ठ प्रथा

हसिना काझी

*दुभागली धरणी माता*
*फाटले आकाश गऽऽ*
*कधी संपणार नारी*
*तुझा वनवास गऽऽ*

ज्या देशात स्त्री ही देवता मानली जाते, तिची पूजा केली जाते, त्याच देशात स्त्री निश्चिंतपणे श्वाससुद्धा घेऊ शकत नाही. हुंड्यासाठी नववधूचा खून, माहेरून पैसे आणले नाहीत म्हणून मानसिक छळ...अशा एक ना अनेक बातम्या वर्तमानपत्राच्या पानावर झळकतात. स्त्रियांचे जीवन नरकासमान करून टाकण्यास कारणीभूत ठरलेली ही हुंडा पद्धती दिवसेंदिवस फोफावत चालली आहे.

आपल्या देशात आर्थिक विषमता फार मोठ्याप्रमाणात आहे. एका बाजूला गडगंज संपत्ती असणारे भांडवलदार आहेत, तर दुसऱ्या बाजूला एका वेळेच्या अन्नाची भ्रांत असणारे लक्षावधी गरीब आहेत. एका बाजूला उंचच उंच अलिशान इमारती आहेत तर दुसऱ्या बाजूला कंगाल झोपडपट्ट्या आहेत. अशा दोन परस्परविरोधी समाजात एका गोष्टीचे साम्य आहे व ती म्हणजे 'हुंडाबळी'. श्रीमंतांमध्ये हुंड्यासाठी ज्याप्रमाणे बळी घेतले जातात, त्याप्रमाणे गरिबांच्या झोपड्यातही

हुंड्यासाठी खून केले जातात. हुंडा ही एक आजच्या समाजाला ग्रासणारी जीवघेणी समस्या आहे. उत्तरेपासून-दक्षिणेपर्यंत पुरातन काळापासून आजपर्यंत ही अमानूष अघोरी रूढी चालू आहे. रामायण, महाभारतासारख्या महान ग्रंथातही हुंड्याचा उल्लेख आहे. इतकी ही प्राचीन रूढी आहे. हुंडा घेणे जेवढे वाईट, तेवढेच हुंडा देणेही चूक.

हुंड्याचे जहर पिढ्यान्‌पिढ्या आपल्या समाजात भिनले आहे. त्यामुळे मुलगी जन्माला आली की आई-वडलांच्या काळजाचा ठोका चुकतो. मुलीला जन्म देणाऱ्या स्त्रीकडे उपेक्षेने पाहिले जाते. म्हणून मी त्यांना सांगते-

*कन्या झाली म्हणून नको करू हेळसांड,*
*गोपू बाळाच्या शेजारी सोनूताईचा पाठ मांड,*
*लेकापरीस लेक ती काय उणी?*
*हिरा नव्हे, हिरकणी सोमूताई*

अशा शब्दांत कन्येचे महत्त्व साने गुरुजींनी केले आहे. कित्येक गरीब घरात तर ह्या हुंड्याच्या रूढीपायी कित्येक मुली अविवाहित राहतात. तर काही आत्महत्या करतात.

प्राचीन काळी विवाह म्हणजे कन्यादान मानले जात असे. त्यामुळे मुलीची सासरी पाठवणी करताना तिच्याबरोबर धन, धान्य, गायी इत्यादी गोष्टी दिल्या जात. परंतु हा सर्व मामला खुशीचा असे. मग तिच्या आई-वडलांकडून फारशी अपेक्षा नसे.

आज मात्र या गोष्टीला पूर्ण विकृत वळण लागले आहे. मुलीचे लग्न म्हणजे घबाड मिळवणे, अशी चुकीची समजूत झाली आहे. माणसातील माणूस हरवला आहे. तो आता दानव झाला आहे. अडलेले वधुपिता ह्या गोष्टी पूर्ण करतात. पण वर नावाच्या भस्मासूराची भूक वाढतच जाते. मग लग्नानंतर मुलीचा छळ सुरू होतो. तिला आत्महत्येला प्रवृत्त केले जाते. मग नववधू अगोदर जीची हत्या झालेली असते ती आपल्या सवतेला म्हणते की -

*हुंड्यापायी तू जळताना*
*मी सौदा करीत आहे*
*विस्कटलेल्या तुझ्या घरावर*
*महाल माझा बांधत आहे.*
*तडफडणाऱ्या तुझ्या आत्म्याला*
*एकदाच तिलांजली देऊन*
*करुण किंकाळ्या हे झाकण्यासाठी*
*मी सनई वाजवत आहे*

आपल्या पत्नीला हुंड्यापायी आत्महत्येला प्रवृत्त करणाऱ्या नराधमाला नवे घबाड हवे असते, हे महाभयानक सत्य आहे.

म्हणूनच हुंडा ही एक भयंकर समस्या आहे. हुंडा घेणे म्हणजे माणसाला विकत घेणे, स्वत:ची किंमत करून घेणे. आजकाल मुलींनी आपली पात्रता सिद्ध केलेली आहे. अनेक वेळा लग्न करून येणारी मुलगी घराला पोसते. घरच्या उत्पन्नात भर घालते. अडीअडचणीत समर्थपणे ती घराला सावरते, अशा कर्तबगार मुलीकडून हुंड्याची अपेक्षा करणे योग्य होईल का?

कुटुंबात स्त्री-पुरुष समान आहेत. पत्नीला अर्धांगिनी म्हटले जाते. मग तिच्याकडून हुंड्याची अपेक्षा का? त्यामुळे मुलगी जन्माला येणे ही आपत्ती मानले जाते. तिला या जगात येण्यास प्रतिबंध केला जातो. म्हणून प्रत्येक सूज्ञ माणसाने या हुंड्याला हद्दपार केले पाहिजे.

*समान मानव माना स्त्रीला*
*तिची अस्मिता खुडू नका*
*दासी म्हणून पिटू नका*
*वा देवी म्हणून भजू नका*

हुंडा घेणे जरी कायद्याने गुन्हा असला तरी 'वरदक्षिणा' या नावाखाली हुंडा घेतलाच जातो. जावयाला मदत म्हणून सुनेला माहेरून पैसे आणायला लावणारे अनेक आपण पाहतो. जावयाने मदत म्हणून पैशाची मदत घेतल्यास त्याला हुंडा म्हणता येणार नाही. असा कायदा असल्यामुळे असे पैसे मिळवण्यासाठी सुनेचा वाटेल तसा छळ करणारे या पैशाला 'हुंडा' म्हणता येत

नसल्याने कायद्याच्या कचाट्यातून सहिसलामत निसटतात.

अनेक सुखस्वप्ने मनाशी रंगवून बोहल्यावर चढणारी नववधू एकीकडे बापाची होणारी त्रेधातिरपीट पाहून व्याकूळ झालेली असते. घर, जागा, जमीनजुमला या बळाचा वापर करून हुंड्याचा आकडा वाढताच त्याची पूर्तता नाही झाली तर माणुसकी पायाखाली तुडवून त्या नवऱ्याला निघून जायला सांगणारे सराईत नातलग असतात. शेवटी सामाजिक बंधनात अडकलेला बाप आपल्या लेकीसाठी गळ्याला दोरी लावायला तयार झाला तरी हुंडा घेणारे त्याची कीव करत नाहीत. या घातक समस्येविरुद्ध आज काही सामाजिक स्त्री सख्या काम करीत आहेत. पण ते प्रयत्न पुरेसे नाहीत. त्यासाठी मोठी क्रांती व्हायला हवी. समाजातील तळागाळापर्यंत प्रबोधनाचे कार्य पोहचायला हवे. समस्त महिला वर्गात हुंड्याविषयी चिड निर्माण केली पाहिजे.

अनेक वेळा विवाहित स्त्रीच्या छळाला दुसरी स्त्री- सासू वा नणंद जबाबदार असते. क्षुल्लक कारणासाठी त्या नवविवाहित स्त्रीला जगणे अशक्य करतात. स्त्रीच स्त्रीची कट्टर शत्रू आहे, असे म्हणायला हरकत नाही.

मानवतेच्या भूतदयेचा, मीच गळा घोटीत आहे
या निर्घृण समाजाची मी एक नागरिक आहे
ते चित्र पालटेल का? मन माझे दबेल का?
तूही स्त्री मीही स्त्री, जाणीव मला होईल का?

हुंडा घेणाऱ्या वा इतर कसलीही मागणी करणाऱ्या पुरुषांबरोबर लग्नच करायचे नाही. अशा कुटुंबावर सामाजिक बहिष्कार टाकणे, असेच अमोघ शस्त्र या हुंड्याच्या अनिष्ठ रूढीवर योजायला हवे. त्यासाठी सर्व स्त्रियांत प्रबोधन व्हायला पाहिजे. एकजूट व्हायला हवी.

■

काझी हसिना सलीम
मु० पो० तांदूळवाडी, ता० माळशिरस,
जि० सोलापूर

---

**महाराष्ट्राचा गावगाडा**

अखिल बहुजनसमाज, निदान खेड्यांतील सर्व गावगाडा तरी मुळासकट दुरुस्त झाला पाहिजे. मी सांगतो ही गोष्ट हिंदुस्थानात निदान महाराष्ट्रात तरी नवीन नाही. मी केवळ भविष्यपुराणही रचित नाही. परकीय सत्तेच्या धाडी वारंवार येऊन शेवटी अशा संकटपरंपरेवर आधुनिक यांत्रिक युगाच्या आपत्तीने कळस चढविल्यावर, आमच्यातला पूर्वीचा गावगाडा आता जमीनदोस्त झाला आहे. पण तो कधी नव्हताच अशी आपली गैरसमज होऊ देऊ नका. महाराष्ट्रात स्वराज्य वरचेवर उसळी मारून डोके वर करते, ह्याचे कारण महाराष्ट्रातली रयतवारी जमीनधारणेची पद्धतच नव्हे, तर महाराष्ट्रातील पूर्वीचा उतारपेठेवर ताबा ठेवणारा गावगाडा हाच होय.

महाराष्ट्राचा राजा महाराष्ट्राचा कुणबीच होता. वाणी व ब्राह्मण हे त्यांचे आश्रित होते. महाराष्ट्रातील मराठ्यांनी ह्या वाण्या-ब्राह्मणांच्याच नव्हे, तर साळी-कोष्टी वगैरे चतुर कारागिरांच्याही वसाहती आपल्या सोयीप्रमाणे वेळोवेळी करविल्या आहेत. ह्याचा इतिहास अद्यापि लिहावयाचा आहे. ही गोष्ट कोरडा व पोकळ जातीचा अभिमान बाळगणाऱ्यांना मुळीच कळण्यासारखी नसून खऱ्या राष्ट्रोद्धारकांनी शोधून काढून आमलात आणावयाची आहे!

: **महर्षी विठ्ठल रामजी शिंदे** (संदर्भ - 'शिंदे लेखसंग्रह,' संपादक : मा० प० मंगुडकर, पृ० ३०२.)

सगुणा

## निबंध-४

# शहरीकरण व स्त्रियांचं बदलतं जग

रंभादेवी गुंड

एकविसाव्या शतकात उभे असलेले आपण सर्वजण तंत्रज्ञानाच्या प्रगतीनं भौतिक विकासाने सुखावून उंच झेप घेत आहोत. या नव्या शतकामध्ये विलक्षण गतिमानता असणार आहे. क्षितिजापलीकडचा शोध नवी नवी आव्हानं सामोरी आणणारे आहे. या सर्व वाटचालीत संघर्ष अपरिहार्य ठरणार आहे. पण या संघर्षातूनही स्वप्न पाहणारी मनं, विधायक काम करणारे हात अधिकच मार्गदर्शक ठरणार आहेत.

'नव्या शतकातील मानवासमोरील आव्हाने' हा विषय खरं म्हटलं तर प्रत्येक विचारी माणसाला चिंतन करायला लावण्याजोगा आहे. वाड्यावस्त्यांमध्ये विखुरलेल्या भारतासारख्या विशाल राष्ट्राला आध्यात्मिक वारसा मोठा आहे. त्यामुळे गरीब व मागासलेल्या वंचित घटकांमध्ये अंधश्रद्धाळूपणा अधिक आहे. उलट विस्तार पावणाऱ्या शहरांवर प्रगतीच्या नावाखाली पाश्चात्त्य संस्कृतीची मोठी छाप पडत आहे. त्यातून  समाजामध्ये अस्थिरता, मोह आणि छळ यांचे उधाण झालेले आहे.

स्त्रियांच्या वर्तमान स्थितीचा अभ्यास करताना एका कवीच्या विधानातील आशय आठवतो. एका कोवळ्या रोपट्याच्या पानाआड लपलेल्या अस्फुट कळीला कवी सांगतोय : ''हे अस्फुट कलिके; तू पानाआड झाकूनच

राहा, अस्फुटच राहा. जगातील क्रूरतेची, निष्ठुरपणाची दृष्ट तर नाही ना लागणार?''

या आशयानुसार आज समाजामध्ये मोठ्याप्रमाणावर स्त्रियांचे शोषण होताना दिसते. वंशाच्या दिव्याच्या नावाखाली जन्मा अगोदरच स्त्री भ्रूणहत्या करणे, छेडछाड करणे, बलात्कार, सामूहिक बलात्कार, हत्या, लैंगिक शोषण यांसारखे प्रकार उघड व उजळ माथ्याने केले जात आहेत. माणसाचं माणूसपण खच्ची करणारा हा छळ अधिक भीषण व भयावह असतो.

समाजाचा स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टिकोन हा फक्त भोगवस्तू म्हणून आहे. मोलकरणी, शेतमजूर, बांधकामावरील काम करणाऱ्या स्त्रिया, कारखाने, दुकाने, दवाखाने, खेड्यातील आरोग्यकेंद्रे बँका, शाळा, प्रशिक्षणार्थी स्त्रिया यांचे लैंगिक छळ होत आहेत. कायद्याने पुरेसे पाठबळ नसल्याने त्यांचे आवाज दबले जात आहेत.

खुल्या जागतिकीकरणामुळे उद्योगामुळे जीवघेणी स्पर्धा निर्माण झाली आहे. अशा स्पर्धात्मक बाजारपेठेमध्ये टिकून राहण्यासाठी उत्पादक जाहिरातींचा आधार घेत असतात. वस्तूची गुणवत्तेपेक्षा उथळ मादक दृश्ये दाखवून ग्राहक आकर्षित केले जातात. या जाहिराती दृश्यरूपात माध्यमांद्वारे दाखवल्या जातात. ही माध्यमे कुटुंबामध्ये सर्वांसमवेत पाहण्यात येत असल्याने त्याचा लहान मुलांच्या मानसिकतेवर वाईट परिणाम होतो. त्यातून उफाळून येणाऱ्या भावनांच्या आवेगातून अनेक गुन्हे त्यांच्या हातून नकळत घडत जातात. याचा समाजजीवनावर अधिक वाईट परिणाम होतो. नेहमी नेहमी निर्माण होणाऱ्या नैसर्गिक व मानवनिर्मित संकटातून बऱ्याच वेळा अज्ञान, गरिबी, याचबरोबर अनाथपणही वाट्याला येते. यांसारख्या कारणाने छत्र हरपलेल्या मुली यांसारख्या अमानुष छळाच्या बळी पडतात आणि देह-व्यापाराच्या बळी पडतात.

वाढती लोकसंख्या, स्त्रियांच्या संस्थेत होत जाणारी घट या सगळ्याचा विचार करता मानवता व माणुसकी यांचा बळी जाताना आपण उघड्या डोळ्यांनी पाहत

वस्तूची गुणवत्तेपेक्षा उथळ मादक दृश्ये दाखवून ग्राहक आकर्षित केले जातात. या जाहिराती दृश्यरूपात माध्यमांद्वारे दाखवल्या जातात. ही माध्यमे कुटुंबामध्ये सर्वांसमवेत पाहण्यात येत असल्याने त्याचा लहान मुलांच्या मानसिकतेवर वाईट परिणाम होतो. त्यातून उफाळून येणाऱ्या भावनांच्या आवेगातून अनेक गुन्हे त्यांच्या हातून नकळत घडत जातात. याचा समाजजीवनावर अधिक वाईट परिणाम होतो.

------

असतो.

स्त्रीत्व हे उत्कट, अंतर्मुख आणि भावगर्भ, तसेच सुजाण आणि निग्रही, अनेकदा ओठ मिटून सोसणारं, अटळ प्राक्तनासाठी हसून साजर करणारं आणि वेदनेलाही गोडवा आणणारं आहे, हे विसरून समाज हे सर्व संपवत आहे, याचाच प्रत्यय वेळोवेळी येतो.

८ मार्चला एकीकडे जागतिक महिला दिन साजरा केला जातो, तर त्याच दिवशी दुसरीकडे स्त्रियांचा हुंडाबळी, अन्याय, अत्याचार व विनयभंग केला जातो. विज्ञानाचा आविष्कार गर्भजल चिकित्सा, गर्भाचे व्यंग शोधून काढण्यासाठी असते. परंतु त्याचा वापर लिंगनिदान करून स्त्रीभ्रूण हत्येसाठी होतो. हे एक अत्याचाराचे प्रतीक आहे. हुंडा व मुलगा म्हणजे वंशाचा दिवा ही प्रमुख कारणे स्त्रीभ्रूणहत्येमागे आहेत. परंतु हा दिवा पेटवायला देखील स्त्रीरूपी वात लागणार आहे, का वातीऐवजी पुरुष स्वत:च त्यात जळणार आहेत. योग्य वेळी जर गांभीर्यपूरक विचार झाला नाही तर हे जग म्हणजे केवळ मुलांचा बाजार बनेल. देशाला स्वातंत्र्य मिळून ५० वर्षे होऊन गेली, पण स्वत:ला मानसिक समाधान मिळण्याइतकी स्त्री अजून स्वतंत्र्य झाली नाही.

आपल्या संस्कृतीने स्त्रियांच्या दुर्बलतेचा इतिहास सुरवातीपासून मनावर बिंबवल्यामुळे समाजव्यवस्थेची मानसिकता बदलणे आवश्यक आहे. कारण स्त्री ही पुरुषापेक्षा मनाने फार धैर्यवान असते. कोणतेही संकट आले तरी लवकर न खचता शेवटपर्यंत झुंजण्याची तिची तयारी असते. तू काही कमी नाहीस, का कमी लेखतेस स्वत:ला, दाखव तुझी किंमत या जगाला, कारण तुझ्याशिवाय अर्थच नाही या जगण्याला. आज कोणतेही क्षेत्र असे नाही की जिथे स्त्रियांनी आपला ठसा उमटवलेला नाही. उत्तर प्रदेशच्या गव्हर्नरपदी श्रीमती सरोजिनी नायडू, विदेशी राजदूत श्रीमती विजयालक्ष्मी पंडीत, भारताच्या पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी, पोलिस अधिकारी किरण बेदी, पहिली स्त्री डॉक्टर आनंदीबाई जोशी, इंग्लिश खाडी पोहून जाणारी आरती शहा, ऑलिंपिकपटू पीटी उषा, रेल्वे ड्रायव्हर सुरेखा भोसले अशी कितीतरी उदाहरणे देता येतील. यशस्वी पुरुषामागे एखाद्या स्त्रीचा हात असतो. तो यशस्वी होण्यामागे, स्त्रीची खरीखुरी साथ लागते. कोणत्याही पुरुषाच्या विकासात स्त्रीचा हात असतो. स्त्री पुरुषाला आधार देत असते. म्हणजे तिच्या सहकार्याशिवाय पुरुष पुढे जाऊ शकत नाही.

*दुर्गे दुर्घट भारी तुझवीण संसारी ।*
*अनाथ नाथे अंबे करुणा विस्तारी ।।*

या ओळींप्रमाणे आपले रक्षण करणारी, तारणारी दुर्गामाता आहे. तिच्या कृपेनेच आपण अबलाच्या सबला झालो आहोत. थोडक्यात, स्त्री ही कुटुंबाचा नव्हे तर देशाचा आधारस्तंभ आहे. ती सबला आहे. ती रत्नाची खाण आहे.

*समाज मानव माना स्त्रीला, तिची अस्मिता खुडू नका*
*दासी म्हणून पिटू नका, का देवी म्हणूनी भजू नका*

'जिच्या हाती पाळण्याची दोरी ती जगाला उद्धारी' या सावित्रीबाई फुले यांच्या सांगण्याचे रहस्य तेच आहे.

अशी ही महिला प्रगतीचा वसा घेऊन विविध क्षेत्रांत ठसा उमटवणारी, तुळशीजवळ सांजवात लावणारी, तू शापीत अहिल्या तू, मृत्युदेवतेला जिंकणारी सावित्री तू, शिवराय घडवणारी जिजाऊ तू रणरागिणी, पाठीशी मुलाला बांधून लढाई करणारी झाशीची राणी तू, आकाशात झेप घेऊन आकाशातच विलीन होणारी कल्पना तू, पडक्या घराच्या भिंती लिंपणारी तू... स्त्रीच्या सर्वांगीण विकासात केवळ तिने एकट्यानेच लढा न देता तिच्या कुटुंबाने, सर्व समाजानंच उभं राहिलं पाहिजे. यशस्वी पुरुषामागे स्त्रीचा हातभार असतो, हे तितकेच त्रिवार सत्य आहे.

पूर्वीपेक्षा आज समाजात महिलांच्या प्रगतीचा वेग वाढत आहे. तिचा हा वेग तिला जगावर राज्य करायला लावणारा आहे. जे पुरुष अहंकार सोडून तिच्याबरोबर येणार आहेत, त्यांना घेऊन ती पुढे जाणारच आहे. कारण उद्याचे जग तिचे असणार आहे. मी सर्व महिलांना सुखी संसाराचे रहस्य सांगते.

*केवळ आपल्या स्वार्थासाठी कलह नसावा घरामध्ये*
*आपुलकीच्या नात्यामधुनी स्नेह जपावा मनामध्ये ।।धृ ।।*
*येणाऱ्याला पाणी द्यावे मुखात वाणी गोड हवी*
*जाणाऱ्याच्या मनात फिरुनी येण्यासाठी ओढ हवी*
*ऐसा प्रेमळ माणुसकीचा झरा वाहावा मनामध्ये ।।१ ।।*
*भांड्याला लागतेच भांडे विसरून जावे क्षणामध्ये*
*परस्परांना समजून घ्यावे आढी नसावी मनामध्ये ।।२ ।।*
*रुसवे फुगवे नको कुणाचे मोद राहावा मनामध्ये*
*नित्य काळजी घरात घ्यावी वय झालेल्या पानांची*
*ज्याची त्याला द्यावी जागा वयाप्रमाणे मनाची*
*एकमताने निर्णय घ्यावा नको दुरावा मनामधी ।।३ ।।*
*लळा जिव्हाळा आत असावा नको उमाळा वरकरणी*
*नको घराला गर्व धनाचा लीन राहावे प्रभुचरणी*
*दिवस राती परमेश्वराचा वास असावा घरामध्ये ।।४ ।।*

■

रंभादेवी गुंड
भुसारपेठ, वाणी गल्ली,
मु० पो० मोहोळ, जि० सोलापूर

सगुणा

निबंध-५

# समाजकारणातील **स्त्रियांची** भूमिका

**शैला कदम**

प्रत्येक ठिकाणी आज गौरवली जाणारी, प्रत्येक परिस्थितीत निर्भयपणे उभी राहणारी, कधी आई म्हणून मायेने कुरवाळणारी ताई म्हणून हक्काने भांडणारी, आजी म्हणून गोष्ट सांगणारी, मैत्रिण म्हणून साथ देणारी, पत्नी म्हणून जीवन फुलवणारी, मुलगी म्हणून जीवन सार्थकी लावणारी स्त्री. एक स्त्री अनेक नाती सांभाळत असते. कितीतरी जबाबदाऱ्या पार पाडत असते. परंतु आज स्त्री काय आहे, कुठं आहे? देशाच्या अर्थ-धर्म व समाजकारणातील स्त्रियांची भूमिका काय असावी, देशाच्या कारभारात आपली जबाबदारी काय? या विषयावर मी काही माझं आकलन मांडायचा प्रयत्न करते.

**स्त्रीचं 'अर्थ'कारणातील स्थान**

भारत हा पूर्वीपासूनच अर्थव्यवस्थेबाबत प्रबळ देश समजला जातो, असं म्हणतात. एके काळी भारतात सोन्याचा धूर निघत होता. आमची इतिहासपरंपरा आम्हाला सांगते की पूर्वी स्त्री हीच अर्थव्यवस्था पाहत होती. आमच्या मराठी स्वराज्याचे दुसरे छत्रपती राजे संभाजी यांनी स्वत:च्या पत्नी महाराणी येसुबाई यांना स्वतंत्र अर्थकारभार दिला होता. त्यांना स्वत:च्या नावाने मुद्रा काढून दिली. खंडेराव होळकरांच्या नंतर स्वराजाची

अर्थव्यवस्था सांभाळली. आज इंद्रा नूई सारखी एक भारतीय स्त्री 'पेप्सीको'सारख्या जागतिक कंपनीची सीइओ बनून कंपनीची अर्थव्यवस्था व व्यवहार पाहत आहे. सुधा मूर्ती सारखी उद्योग क्षेत्रात नाव कमवत आहे. विना पाटील केसरी टुर्सने जग फिरवत आहेत. थोडक्यात अर्थव्यवस्थेत स्त्री महत्त्वाची आहे, पूर्वीही महत्त्वाची होती आणि उद्याही महत्त्वाची राहणार.

कृष्णाच्या काळापासून गवळ्याच्या गवळणी दूध-दही-ताक-लोणी विकून आपल्या कुटुंबाच्या आर्थिक गरजा पूर्ण करत होत्या. अगदी तेव्हापासून ते आत्तापर्यंत पापड लाटणाऱ्या स्त्रियांपर्यंत कुणी धुणीभांडी करतंय, तर कुणी स्वयंपाक, कुणी नोकरी, हे सगळं फक्त घराचं अर्थखातं निट राहावं म्हणून. फक्त स्त्री घराबाहेर काम करतेय असं नाही तर घरातही ती सगळी कामं सांभाळून विणकाम, भरतकाम करत आहे. विविध क्लास घेत आहेत. विविध कला ती आत्मसात करत घेत आहे.

ह्या सगळ्यात खेडी-शहर असा प्रश्नच येत नाही. कारण खेड्यातील स्त्रीला शारीरिक कष्ट जास्त असतात. घर, संसार, शेती काम, कुक्कुटपालन, शेळीपालन, दुग्धव्यवसाय करून ती पैसा कमवते आहे. 'स्त्री' खेड्यातील असो अथवा शहरातील तिने स्वतः कमवलेल्या पैशांवर तिचा थोडाही हक्क नसतो. पैसा कमवायचा, पण खर्च मात्र करायचा नाही, आणि जरी खर्च केला तरी घर-संसार उपयोगी वस्तू आणण्यात खर्च करायचा. मग प्रश्न पडतो स्त्री फक्त पैसा पुरवणारं मशिन आहे का? पैसा देणे हेच का तिचे अर्थशास्त्रातील महत्त्व.

आजची दुष्काळी परिस्थिती भीषण व भयंकर आहे. पण दुसरीकडे मुली नाचवल्या जातात. पैसा नाही म्हणून मनाविरुद्ध पैशासाठी स्त्रिया, तरुण मुली 'डान्सबार गर्ल' म्हणून काम करतायत. आमच्या विकसनशील-विकसित महाराष्ट्रातील मुली इतर राज्यांत जाऊन पैसा कमवतायत. मग प्रश्न पडतो की आज देशाच्या अर्थकारणात स्त्रीची भूमिका नेमकी काय आहे. तिचे स्थान? ती फक्त पैसा पुरवणारं मशिन आहे का?

एकीकडे अर्थकारणातील सर्वस्व, सर्वांत मोठी उद्योजिका म्हणून तिला मान आपणच द्यायचा, तर दुसरीकडे आपणच तिचं स्थान कमी करायचं, तिचं खच्चीकरण करायचं, हे कोण करतंय तेही पाहणं गरजेचं व महत्त्वाचं.

**'धर्म'कारणातील स्त्रीचं स्थान**

'धर्म' हे सामाजिक, राजकीय, सांस्कृतिकदृष्ट्या महत्त्वाचे अंग आहे. आज आपण तिला कधी जन्म देणारी, आपलं लालनपालन करणारी जननी केलं तर कधी दुष्टांचा नाश करणारी माता काली, माता दुर्गा, माता भवानी केलं. सगळ्या कशा स्वत:च्या सोयीच्या कल्पना! पोथी-पुराणं, उपनिषदांत पण स्त्री उपेक्षितच ठेवली गेली. गार्गी, मैत्रेयी, लोपमुद्रा यांसारख्या ज्ञानसंपन्न, बुद्धिवंत विदूषी आजपण अलिप्तच का? धर्मात एकीकडे माता देवी म्हणून तिची पूजा करायची, तर दुसरीकडे त्याच मातेला धर्माच्या नावावर देवाला सोडायचं. तिच देवी, माता जन्माला आली की दु:ख करायचं, त्याच मातेला माझ्या पोटी मुलगा जन्माला यावा म्हणून नवस करायचा. मुलीला दासी, मुरळी बनवायचं.

जगप्रसिद्ध अर्धनारी नटेश्वर - जगातील स्त्रीपुरुष समानतेचं समतेचं, धार्मिकतेचं प्रतीक जे आम्हाला समानता शिकवतं. पण आम्ही त्यात डावीकडं आहे, मग स्त्री डावी समजतो. आमचा धर्म आम्हाला सांगतो, स्त्री ही प्रथम माता आहे. 'मातृदेवभव' आमच्या धर्मसंकल्पनेत सर्वप्रथम येतं. माता ही प्रत्येक व्यक्तीची प्रथम दैवत आहे. करुणेची प्रेरणा व अनुभूती असते. शंकराचार्य म्हणतात ''कुपुत्रो जायेत, क्वचिदपि कुमाता न भवति.'' 'धर्म' ही संपूर्ण जीवन व्यापून टाकणारी संकल्पना आहे. 'धर्मो रक्षित!' असं म्हटलं जातं.

स्मृतिकारांनी धर्म संकल्पनेत स्त्रीविषयी म्हटलं आहे की ज्या घरी स्त्रियांचा योग्य सत्कार होतो, तेथे देव संतुष्ट असतात. आणि या उलट स्थिती असेल तर त्या घरातील मालकाच्या कामाला यश येत नाही. प्रत्येक

स्त्रीला पती चांगला मिळतोच असं नाही, तेव्हा स्त्रीने पूर्ण धैर्य दाखवावे. स्त्रीची योग्यता मोठी आहे. तेव्हा पुरुषाने तिचा अवमान करू नये. स्त्रिया स्वभावत:च काटकसरी असल्याने द्रव्याचा संचय, त्याची व्यवस्था आणि विनियोग या बाबी तिला पाहू द्याव्यात.

आपण कधी ह्या धर्म संकल्पना अभ्यासतो का? आपण तिला धार्मिकतेच्या नावाखाली खूप दाबतो. स्त्री एक मूर्ती नाही, तिला पण मन आहे. मान-सन्मान आहे. याचा पण विचार व्हायला हवा? आहो जर पत्नी नसेल तर कंबरेला सुपारी खोवून पूजा करणारे आम्ही काय तिची योग्यता ओळखू काय? तिचं धर्म-संकल्पनेतलं महत्त्व समजू? स्त्री धार्मिक कार्यात हवी, कारण छोटी-मोठी कामं. उदा० सडा, रांगोळी, नैवेद्य कोण करणार? हेच तिचं महत्त्व. आज २१ व्या शतकात स्त्रीला सत्यनारायण घालू दिला जात नाही. लग्नविधी म्हणू दिले जात नाहीत. मग आम्हाला आमच्या धर्माने हेच शिकवलं का? हीच का आमची 'स्त्री'विषयी धार्मिक संकल्पना? हेच का तिचे धार्मिक-धर्म संकल्पनेतील स्थान.

### 'समाज' संकल्पनेतील स्त्रीचे स्थान

असं म्हणतात की समाज हा एक रथ आहे आणि स्त्री-पुरुष हे ह्या रथाची दोन चाके आहेत. पण खरंच का ह्या समाजात ही दोन चाकं समान चालत आहेत? खरंच का त्यांना तसा समान दर्जा आहे? स्त्रीला समाजात समान वागणूक नाही. समान दर्जा नाही. समान स्थान नाही. २१ व्या शतकात विज्ञान-तंत्रज्ञानात मोठी क्रांती झाली. जग चंद्रावर, मंगळावर गेलं. माणसाचं सामाजिक जीवन बदललं. समाजरचना बदलली. समाजाने प्रगती केली, परंतु स्त्रीचं काय?

आज जगात समाजात स्त्री सर्वक्षेत्रात आहे. नुसती सहभागी नसून सर्वश्रेष्ठ ठिकाणी आहे. भारत सरकारने तर ५०% आरक्षण दिलं आहे. परंतु त्याचा तिला काय फायदा? तिला त्या आरक्षणाचा काय उपयोग? या कायद्याने तिला समाजात स्थान दिले का? स्त्री या दीड अक्षरी शब्दात कितीतरी प्रश्न आहेत. समाजाची प्रगती व्हावी म्हणून आम्ही तिला पंचायत, स्थानिक स्वराज्य संस्था यामध्ये स्थान दिलं, तिला तिथं नेलं, तिला सदस्य, सरपंच, उपसरपंच, पंचायत समिती सदस्य, अध्यक्ष बनवलं. आज गौरवाने सांगतो ती अबला नाही, सबला आहे. पण आज ती तेवढीच कष्टी, दुःखी आहे. आजही ती तेवढाच मार खाते. आजही ती 'रांधा, वाढा नि उष्टी काढा' आयुष्य जगते आहे. दुसऱ्यांची किंवा घरातील माणसांची सेवा केल्याने काय फरक पडतो, असं आपण म्हणतो, मग तिची सेवा कोणी करतं का? आज समाज बदलला आहे. समाजाचं स्वरूप बदलत आहे. स्त्री पण बदलत आहे. प्रत्येक क्षेत्रात पुढे असली तरी सेकंड प्लेसलाच का?

समाजरीती किती विचित्र आणि विक्षिप्त असतात, किती विरोधाभास निर्माण करतात. एखादी निर्भयासारखी घटना घडते काय, त्या घटनेने देश आंदोलन करतो काय? आपण निर्भया पुरस्कार प्रदान करतो, पण वास्तव किती विचित्र आहे. आज पण समाजात कितीतरी निर्भया आहेत ज्या बोलू शकत नाहीत. आज अजून कितीतरी निर्भयांचा बळी जातो आहे. आज समाजात स्त्रीने विश्वास ठेवायचा कोणावर? कारण प्रत्येक पुरुषी नातं तिला वासनेचा शिकार करू पाहतोय. वडील, भाऊ, काका, मामा, आजोबा कुणी शिल्लक नाही. प्रेम कर, माझ्याशी लग्न कर, शारीरिक संबंध ठेव, नाही तर मग खून ॲसिड हल्ला होत आहेत. ब्लॅकमेल करणं, अश्लिल फोटो बनवणं हे प्रकार वाढत आहे. मुलीच्या आब्रूचे धिंडवडे काढणं, तिचा संसार उद्ध्वस्त करणं सर्रास घडत आहे. स्त्रीच्या चारित्र्यावर शिंतोडे मारणारा हा समाज.

आजही कितीतरी स्त्रिया चार भिंतीत बंद आहेत. परिस्थिती बदलत आहे. बदलणार आहे. सध्या थोड्या प्रमाणात बदलत आहे. स्त्रीचं स्थान तयार होत आहे. फक्त भाषणं देऊन, आरक्षण देऊन वा विविध कायदे करून भागणार नाही. गरज आहे तिला माणूस म्हणून जगवण्याची व जगू देण्याची. सुरुवात स्वत:पासून

करण्याची. समाज हा मांडगूळासारखा असतो. नावं ठेवणं हे समाजाचं काम आहे, पण समाजातील स्थानापेक्षा मनाने तिला जवळ स्थान द्या. स्त्रीला समाज, रूढी-परंपरामध्ये अडकवताना ती माणूस आहे, याचा विचार करा. तिला तिची स्वप्नं पूर्ण करू द्या. तिचा आत्मविश्वास वाढवा, तिचा कमी होणारा टक्का वाढवा.

अत्याचार, बलात्कार, शोषण, हुंडाबळी, स्त्रीभ्रूणहत्या, असुरक्षितता, पैशांसाठीचा वापर, काम, घरसंसार, नोकरी ज्यामध्ये तिच्यावर मानसिक ताण वाढत आहे, ती मानसिक रोगांना बळी पडत आहे. ती स्वत:चं अस्तित्व ठरवत आहे. स्वत:चं स्थान गमावत आहे. मग परत प्रश्न पडतो. कुठाय समाज, कुठाय आम्ही, कुठाय स्त्री, कुठाय नारीशक्ती, स्त्रीशक्ती, कुठाय भारत, कुठाय आमचं स्त्रियांचं ५०% आरक्षण.

मला आज आवर्जून सांगावंसं वाटतं, जेव्हा ऋषी-शिरोमणी सर्वश्रेष्ठ-यज्ञवल्क, विदुषी गार्गीला यज्ञकार्यास बंदी घालतात, तेव्हा गार्गी म्हणते ''जर स्त्री हा एक विषय आहे तर स्त्रीच्या मते पुरुषही एक विषयच आहे.'' मग आज आम्ही पुरुषाला का एवढं महत्त्व देतो? का त्याला प्रतिउत्तर देत नाही. आपला इतिहास स्त्रीप्रधान आहे. आई जिजाऊ, ताराबाई येसूराणी, राणी पद्मावती, राणी लक्ष्मी, फातिमा शेख, सावित्री, रमाबाई, कल्पना चावला हा इतिहास एक परंपरा सांगतो. मग स्त्री का ती परंपरा जपत नाही. पुरुष स्त्रीला महत्त्व देतो का? नाही, मग स्त्रीच का देते. एक विदेशी महिला - मार्गरेट अल्वा म्हणजे आमच्या भगिनी निवेदिता स्वामी विवेकानंदांचं अर्ध काम पूर्ण करत होत्या. ते पण आपल्या भारतात. मग आम्ही का मागे पडतोय? चाणक्याची चाणक्यनीती आम्हाला सांगते ''पुरुषांपेक्षा स्त्रियांचा आहार दोन टक्के, लाज चार टक्के, धाडस सहा टक्के अधिक असते? मग आपण ही चाणक्यनीती कधी वापरणार?

पोथीपुराणं सांगतात - रामायणात राजा भरत रामाला भेटायला गेल्यावर आमच्या रघुकुल स्त्रियांनी कारभार पाहिला. शहाजीराजांच्या अनुपस्थितीत आत्मनिर्भयाच्या, विचारक्षमतेच्या जोरावर माता जिजाऊंनी शिवरायांकडून स्वराज्य स्थापना करून घेतली. राजे संभाजीच्या अनुपस्थिती येसुराणी कारभार पाहत होती. राणी ताराबाई इंग्रजांशी लढली. मदामा कामाने विदेशात जाऊन तिरंगा फडकवला. कॅप्टन लक्ष्मीनाथन स्त्री बटालियन प्रमुख होत्या. राणी लक्ष्मीने ब्रिटिशांना सळो की पळो केले. मला वाटतं आजच्या स्त्रियांना ह्या आमच्या महान, तेजस्वी, पराक्रमी, बुद्धिवंत, विचारसंपन्न, स्त्रीपरंपरा सांगायची गरज आहे. स्त्रीच का समाजाकडंसारखी सहानुभूती मागतेय, ती का स्वत:ला एक साधन म्हणवून घेतेय. ती स्वत:ला दु:खी, कष्टी का बनवतेय?

प्रत्येक यशस्वी पुरुषामागे एका स्त्रीचा हात असतो. मग आज एका स्त्रीच्या मागे खंबीरपणे पुरुष का उभा राहत नाही. जिजाऊंनी स्वराज स्थापलं शहाजीराजांमुळे, वडील लखोजींमुळे हे विसरून कसं चालेल. आमची रमाबाई शिक्षित झाली ती महादेवरावांमुळे, सावित्री शिकली ती जोतीरावांमुळे. महात्मा फुले यांच्यामुळे बहुजन स्त्री सुखात जगते आहे. डॉ० आंबेडकरांमुळे आपले हक्क, अधिकार सांगत आहे. आपला इतिहास सांगतो की वेळ आली तेव्हा तेव्हा प्रत्येक पुरुषाने स्त्रीला मदत केली आहे. एक सच्चा मित्र, आदर्श पती, एक सर्वोत्कृष्ट भाऊ-पिता, मुलगा सोबत असेल तर ती कधी चुकेल का? तसं शक्यच नाही. सामान्य माणसाच्या सामान्य छळातून तिचा बळी जातोय. हा बळी आरक्षण, नारीशक्ती संपवू शकत नाही. हे संपवू शकतो ते पुरुष व त्याची मानसिकता, त्याची साथ. त्याने तिचं मनोबल वाढेल असा आत्मविश्वास द्यावा, मायेचा ओलावा द्यावा. घेऊ द्या तिला तिचे निर्णय. फक्त ते घेताना योग्य-अयोग्य काय ते सांगा. तिला स्वावलंबी, आत्मनिर्भय, विचारसंपन्न करा. हे ती सगळं करू शकते, फक्त गरज आहे ती पुरुषांनी तिला मदत, सहकार्य करण्याची.

■

शैलजा कदम
तांदूळवाडी, जि० सोलापूर
संपर्क : ९७६६६९३७४७

सगुणा

मनमोकळं

# मन रीतं करण्याची 'ती' समृद्ध परंपरा हरवली...

**शरिफा बाले**

'आजी वारली' (आईची आई) असा घरून फोन आला. मनात खूप कालवाकालव झाली, खूप दाटून आलं. मग पुढे गावी जाणं आणि आजीला शेवटचा निरोप देणं, सुतक पाळणं या सर्व गोष्टी झाल्या. सुतक संपल्यानंतर मामा-मामी यांनी सामानाची आवराआवर सुरू केली. आजीकडे अनुभवाचा खूप समृद्ध साठा होता. तिच्या संसारात बऱ्याच गोष्टी होत्या. त्यात एक वस्तू धूळ खात पडली होती, जिला पाहून मी माझ्या बालपणाच्या आठवणीत नकळत गेले. ती म्हणजे शेवया करण्याचा साचा.

उन्हाळ्याच्या प्रत्येक सुट्टीत आम्ही आजीच्या गावी जात असू. उन्हाळा म्हणजे शेतकऱ्यांसाठी आणि शेतीवर आधारित कामं करणाऱ्या कष्टकरी लोकांसाठी फुरसतीचा काळ. या काळामध्ये वर्षभर पुरतील असे बरेच उन्हाळी पदार्थ करण्यासाठी बायकांची धावपळ सुरू होते. वेगवेगळ्या रंगाचे, आकाराचे विविध चवींचे पदार्थ वर्षभर टिकतील अशाप्रकारे जतन करून ठेवले जात असत. त्यासाठी वेगवेगळे धान्य वापरले जात. जाडे गहू हे इतर गव्हापेक्षा जास्त फायबर असलेल्या जातीचे गहू आहेत. या गव्हाच्या पिठाला लवचिकता असते. त्यामध्ये पौष्टिकताही जास्त असते. याच गव्हापासून रवा बनवला

■

या गप्पांमधून वेगवेगळ्या स्वभावाच्या, वेगवेगळ्या जातिधर्माच्या स्त्रिया एकत्र येत असत. हाताने पिठाला आकार देत देत मनाला आणि आयुष्यालाही आकार दिला जायचा. अशा असंख्य गप्पांचा साक्षीदार किंवा सगळ्या जणींना एकत्र आणणारा दुवा म्हणजे शेवई बनवण्याचा तो साचा.

------

जातो. गव्हाच्या किंवा रव्याचा कुरडई बनवल्या जातात. तळेगाव बटाटा हा बटाट्याचा एक प्रकार आहे. हे बटाटे आकाराने मोठे असतात. त्यांची साल खूप पातळ असते. चवीला गोड नसतात. त्यामुळे त्याचे वेफर्स खूप छान बनतात. जाड गहू, रवा, साबुदाणा, तळेगाव बटाटा यांपासून कुरडई, वेफर्स, पापड, ममरा, चकली, उपवासाचे पापड, शेवया असे किती तरी पदार्थ बनवले जायचे. विशिष्ट प्रकारे भिजवून, वाळवून, आंबवूण त्यांची पौष्टिकता वाढवली जाते. असे हे पौष्टिक पदार्थ प्रत्येक पाव्हण्याच्या आणि सणाच्या स्वागताला ताटात हजर असतात. शेवयासुद्धा यातलाच प्रकार. उकडीच्या शेवया या नाष्ट्यासाठी वापरल्या जातात. गरम पाण्यात या शेवया टाकून दोन मिनिटे उकळी आणून त्या चाळणीत उपसून घ्यायच्या. मग त्यावर दूध, तूप, साखर घातली की खाण्यासाठी तयार. आमरसात या उकडलेल्या शेवया टाकून आम्ही आवडीने खायचो.

दुपारच्या वेळी सर्व कामे आवरून झाल्यानंतर आजूबाजूच्या बायका एकत्र जमत. एखाद्या झाडाखाली किंवा सावलीच्या ठिकाणी बसून गप्पा मारत मारत हाताने शेवया करत. कधी कांडव्याच्या साहाय्याने, कधी पाटावर, तर कधी साच्यात घालून वेगवेगळ्या आकाराच्या शेवया बनवत असत. गव्हाच्या पिठाला चांगले घट्ट मळून ठेवले जात. एका मोठ्या पाट्यावर आजीची मैत्रीण किंवा कधी कधी आजी स्वत: दोन्हीकडे पाय टाकून बसायची. पाटावर हाताने पिठाला गोल लांब आकारात वळवले जात आणि इतर जणी ते पटापट तोडून वळवण्यासाठी ठेवत असते. पुढे मग शेवया करायचा साचा आला. त्यातही बसण्याची पद्धत तीच होती. फक्त साच्यामुळे शेवईचा आकार जास्त बारीक झाला. एकाच वेळी जास्त आणि गतीने शेवया होतात. तोच साचा माझ्यासमोर पडला होता.

आजी शेवया करत असताना आम्ही तिथेच बसलेल्या असायच्या. तिथं बसल्याचा फायदा म्हणजे आम्हाला खूप नवनवीन माहिती मिळायची. त्यांच्या गप्पा ऐकण्यात खूप गंमत वाटायची. घरातील लहान मुलांच्या खोड्या, त्यांच्या गमतीजमती एकमेकींना कौतुकाने सांगितल्या जायच्या. एखाद्या विषयी बोलताना हुबेहुब त्याची नक्कल केली जायची. एखाद्या मैत्रिणीने घेतलेल्या निर्णयावर उलटसुलट चर्चा व्हायची. प्रत्येकीच्या घरात सध्या काय सुरू आहे, पुढे काय होणार आहे, याचीही काही एक चर्चा व्हायची. या गप्पांमध्ये मनमोकळेपणाने हसण्याची किंवा रडण्याचीही मुभा असायची. शेवयाच्या एकेक तारेसोबतच मनातला गुंताही सुटत जायचा. कधी कोणाचा रुसवाफुगवा दूर केला जायचा, तर कधी नवीन शीतयुद्धही सुरू व्हायचे. या गप्पांना विषयांचे काही बंधन नव्हते. डोक्याच्या केसांपासून पायांच्या तळव्यापर्यंत, आकाशात उडणाऱ्या पक्ष्यांपासून ते चूल सारवण्यापर्यंत, अल्लाच्या उपासनेपासून ते भूतप्रेत आणि पुनर्जन्मापर्यंत, जमिनीच्या वाट्यापासून ते राजकारण्यांपर्यंत आणि मूल जन्माला येण्यापासून ते वृद्ध व्यक्तीच्या मृत्यूपर्यंत असे अनेक पर्यावरण, अर्थकारण, राजकारण, आरोग्य वगैरे विविध विषयांवर गप्पा होत. या गप्पांमधून वेगवेगळ्या स्वभावाच्या, वेगवेगळ्या जातिधर्माच्या स्त्रिया एकत्र येत असत. हाताने पिठाला आकार देत देत मनाला आणि आयुष्यालाही आकार दिला जायचा. अशा असंख्य गप्पांचा

साक्षीदार किंवा सगळ्या जणींना एकत्र आणणारा दुवा म्हणजे शेवई बनवण्याचा तो साचा.

हल्ली नाष्टा म्हणून रेडिमेड नूडल्सचा (मॅगी) उपयोग केला जातो. गावागावांत स्वस्तात आणि छोट्या पाकिटात मिळणाऱ्या या नूडल्ससुद्धा एक प्रकारच्या शेवयाच आहेत. संगणकीकृत मशिनवर बनवलेल्या या शेवयांवर पौष्टिकतेबाबत नेहमीच प्रश्न चिन्ह असते. फक्त त्या बनवणाऱ्या कंपन्या आकर्षक जाहिराती करतात. शिवाय स्वस्तात मिळतात म्हणून घराघरापर्यंत पोहचल्या आहेत. यात पारंपरिकपद्धतीने तयार केलेल्या पौष्टिक शेवया मात्र आज बेदखल होत आहेत. यात फक्त शेवयाच बेदखल होत आहेत असे नाही तर स्त्रियांच्या चर्चा, गप्पा आणि त्यातून होणारे विचारांचे आदानप्रदान, भावभावनांची, एकमेकींचं दुखलंखुपलं सांगून मन रितं करण्याची चांगली देशी परंपराही बेदखल होत आहे. आजीच्या काळात स्वयंपाकघरात मर्यादित साधनं असायची. काही साधनं ही सर्वांच्या मालकीची असायची. उदा० जो साचा मी पाहत होते तो फक्त आजीकडेच होता. मग उन्हाळ्यात बायका सामूहिकपणे कोण-कधी शेवई करतील, असा निर्णय घ्यायच्या. आजीकडे साचा होता म्हणून आजीला शेवई करण्याचा पहिला मान मिळायचा. बाकीच्या वस्तू म्हणजे- कुरडई करण्यासाठी लागणारं मोठं पातेलं, हाटणी वगैरे याबरोबरच, ते पदार्थ करण्यासाठी मैत्रिणीच्या मदतीचीही तिला आवश्यकता असायची. त्यासाठी इतरांवर अवलंबून राहावं लागायचं. मग मदतीला येणाऱ्या बायकांनासुद्धा थोड्या कुरड्या किंवा बनवलेला पदार्थ भेट म्हणून दिला जायचा. जिचे पातेले आणले असेल तिला एक मापटं गहू दिले जायचे. अशा पद्धतीचा एक अलिखित देवघेवीचा अनौपचारिक व्यवहार त्यामागे असायचा. हा व्यवहार केवळ व्यवहार नसायचा, तर त्यात भावना असायच्या, संबंध जपणं हा मोठा भाग असायचा.

याउलट आजची परिस्थिती आहे. वाढत्या चकचकीत बाजारपेठा, फसव्या जाहिराती, खोटी प्रतिष्ठा

■

...फक्त शेवयाच बेदखल होत आहेत
असे नाही तर स्त्रियांच्या चर्चा, त्यांच्या गप्पा
आणि त्यातून होणारे त्यांच्या विचारांचे-
भावभावनांचे आदानप्रदान, एकमेकींचं
दुखलंखुपलं सांगून मन रितं करण्याची
चांगली देशी परंपराही
बेदखल होत आहे.

------

यामुळे आपले स्वयंपाक घर हे वेगवेगळ्या साधनानं सजले आहे. ज्यातून काही वेळ स्त्रीला स्वावलंबी असल्यासारखं वाटतं, पण त्याच वेळी तिच्या नकळत तिचा एकलकोंडेपणाच्या वाटेवर ढकललं जात आहे, याकडे दुर्लक्ष होताना दिसतं. आता असे पदार्थ फार कमीप्रमाणात होताना दिसतात. कारण शहरांमध्ये काम करणाऱ्या महिलांना वेळ नसतो. ज्यांना वेळ असतो त्यांच्याकडे जागा नसते. गावाकडे ज्यांच्याकडे जागाही आहे, थोडा वेळ आहे, अशा स्त्रियांना जाड गहू घेणं परवडत नाही. कारण सध्याच्या हायब्रीडच्या जमान्यात उत्तमप्रतीचे जाड गहू मिळणे मुश्किलच, आणि मिळालेच तर ते खूप महाग असतात. त्याच्या तुलनेत मॅगी स्वस्त मिळते. काही महिलांचे बचतगट पुढाकार घेऊन हे पदार्थ करतात. त्यातून काही स्त्रियांना रोजगारही मिळतो, पण त्यांच्या चर्चाविश्वात खूप बदल झालेला दिसतो. कारण सवडीचं काम म्हणून बनणाऱ्या शेवया आणि उत्पादनासाठी म्हणून वा अधिकाधिक मजुरी (पैसा) मिळावा म्हणून केल्या जाणाऱ्या शेवया यामध्ये स्त्रियांचे चर्चाविश्व करपलेले दिसते.

बचतगटाचा विचार केला तर तिथेही महिलांचा समूहच असतो. पण तो आजीच्या मैत्रिणींपेक्षा खूपच

■

बरेच बचतगट हे फक्त आर्थिक व्यवहारच करताना दिसतात. ते महिलांचे सुखदुःख, त्यांचे चर्चाविश्व यांच्या वाट्याला जात नाहीत. त्यामुळे अशा गटांमध्ये सामूहिकपणाचा आव आणला जातो, पण त्यात खरंच सामूहिक भावना किती असते, हे त्यांनाच ठाऊक. बचतगटात लोकशाहीचा आव आणला जातो. प्रत्येक बचतगट हे कुठल्या ना कुठल्या राजकीय पक्षांचे असतात. त्याद्वारे ते पक्ष आपला राजकीय अजेंडाच राबवताना दिसतात.

------

वेगळा वाटतो. आजीच्या मैत्रिणी आपल्या घरातील सुख-दुःख सहजगत्या एकमेकींना सांगत. कधीकधी सर्वजणी मिळून ठिकाणी फिरून येत असत. घरात काही नवीन बनवलं असेल तर एकमेकांना कौतुकानं दिलं-घेतलं वा दाखवलं जायचं. हे आता होताना दिसत नाही.

ज्यांच्या घरी सुतक असेल त्यांच्या घरची चूल तीन दिवस बंद असायची. त्या वेळी या मैत्रिणी त्या घरात आलेल्या प्रत्येक पै-पाव्हण्याला जेवण पाठवून द्यायच्या. आम्हाला जितका धाक आमच्या आजीचा वाटायचा तितकाच धाक तिच्या या मैत्रिणींचाही वाटायचा. कारण कोणतीही आजी, मावशी आमच्याकडून एखादी वावगी गोष्ट घडली की आम्हाला हक्कानं रागवायची. याचे बरेच अनुभव आम्ही घेतले.

आताच्या बचतगटांमधील स्त्रियांच्यात- परस्परांत आपुलकीचं नात असेलच असं ठामपणे सांगता येत नाही. कारण बचतगटांच्या मीटिंग भरपूर होतात, पण त्या फॉर्मली मीटिंग असतात, त्यामुळे तिथे प्रत्येकीला अध्यक्षाचं आणि तिच्या जवळच्या मैत्रिणी जे सांगतील तेच ऐकावं लागतं. निर्णयही पुष्कळदा असेच होतात. इतर जणींचे मत विचारात घेतले जातेच, अशी शक्यता फार कमी असते. त्यामुळे तिथेही एक सरंचना निर्माण झालेली दिसते. आजीचा ग्रुप असा नव्हता. प्रत्येक जणी वेगवेगळ्या कामात अध्यक्षस्थानी असायच्या आणि तितक्याच सहजपणे इतरांचं अध्यक्षपण स्वीकारायच्या. आर्थिक बाबतीतही उद्या कोणाच्या शेतावर शेंगा तोडायला जायचं किंवा खुरपणीला जायचं, याचा विचारही सामूहिपणे व्हायचा. त्यात जो शेतमालक आणि मालकीन पैशांच्या व्यवहारात आणि वागणुकीमध्ये व्यवस्थित असेल त्यांना प्राधान्य दिलं जायचं. आठवड्याला किंवा महिन्याला भिशीसुद्धा लावली जायची.

बचतगटांमध्ये आर्थिक व्यवहार होतात, किंबहुना बरेच बचतगट हे फक्त आर्थिक व्यवहारच करताना दिसतात. ते महिलांचे सुखदुःख, त्यांचे चर्चाविश्व यांच्या वाट्याला जात नाहीत. त्यामुळे अशा गटांमध्ये सामूहिकपणाचा आव आणला जातो, पण त्यात खरंच सामूहिक भावना किती असते, हे त्यांनाच ठाऊक. बचतगटात लोकशाहीचा आव आणला जातो. प्रत्येक बचतगट हे कुठल्या ना कुठल्या राजकीय पक्षांचे असतात. त्याद्वारे ते पक्ष आपला राजकीय अजेंडा राबवताना दिसतात. त्यामुळे निर्णयप्रक्रियाही तशीच लोकशाहीचा आव आणणारी असते. बऱ्याच वेळेला पुढाऱ्यांच्या बायकाच बचतगटाच्या अध्यक्ष असतात. त्यामुळे प्रत्येक वेळीच संख्यात्मक पद्धतीने सामूहिकता दाखवली जाते. त्यात गुणात्मकतेचा अभावच असतो.

माझ्या मनात विचारांचं इतक काहुर माजलं ते आजीच्या त्या शेवयाच्या साच्यामुळे. आजीचा काळ पाहता आज स्त्रियांना स्वतःचं मन हक्कानं रीतं करण्याची 'ती' समृद्ध जागा आणि परंपराच हरवली आहे...

■

शरिफा बाले
पुणे

सगुणा

मनमोकळं

# नातं आनंदासाठी नातं की द्वेषासाठी ?

**उमा ढेपे**

तिची धावपळ, लगबग, धडपड मी येता-जाता बघत होते. मोठे-मोठे जड खोके. पिशव्या, भांडे इत्यादी घर-संसाराची रोखठोक जमवाजमव केलेले सामान घेऊन उमा सकाळीच ठक्ठ्क करायला लागली.

माझा नवरा सकाळचा फेरफटका मारून आत बिल्डिंगमध्ये घुसत होता. त्याच्या समोरच उमाची टेम्पोवाल्याशी जोरात बाचाबाची चाललेली मी वरतून बघत होते. नवऱ्याने तिची थोडीशी मदत करून ते मिटवले. त्या बदल्यात तिच्या सामानाला धक्कासुद्धा न लावता तो लिफ्टमध्ये तिला या लोकांशी कसे वागावे, याचे पाठ देत वर आला. मग मला ती कशी कर्कश्श आणि आगावू आहे, हे समजून देऊन आवरा-आवरीला लागला.

उमा माझी जुनी भाडेकरू. ती सात वर्षे माझ्या घरात राहिली होती. तिच्या मते तो तिच्या आयुष्यातील सुंदर काळ होता. मध्ये ती बाजूच्या बिल्डिंगमध्ये राहायला गेली. ती तीन वर्षांनी पुन्हा जागेच्या शोधात मला भेटायला आली आणि बोलता बोलता माझ्याच घराचे दोन भाग करण्याची कल्पना सुचवून गेली. त्यानंतर आठ दिवस आमच्या घरात प्रचंड चर्चा वाद-विवाद होऊन विजयी होण्याची परंपरा राखत मी उमाला परत घर भाड्यानं

दिलं. तेव्हापासून मी जेव्हा मुंबईत असते. तेव्हा तिची लगबग व ढीम्म न हालणारा तिचा मुलगा यांच्या ओझरत्या गाठभेटीने विचारात पडते. उमा वेळ मिळाला तर कधी गप्पा मारत बसते.

तिचा नवरा आठवड्यातून एखादा दिवस येऊन तिची बिल-बाकी बघून जातो. तो त्याच्या आईबरोबर राहतो. मला १९९२ मध्ये छोट्या, गोंडस बाळाला हातात घेऊन नवऱ्याबरोबर घर बघायला आलेली प्रचंड उत्साही, बडबडी उमा सारखी आठवते. आम्ही पुण्याला बदली होऊन गेलो. उमा माझ्या घरात राहायला आली. सगळं घर तेव्हा ती वापरायची. मी केव्हाही मुंबईला आले की तिच्याकडेच उतारायची ती उत्साहानं. बडबडत माझं आदरातिथ्य प्रेमानं करायची. तेव्हा तिचा नवरापण तिच्या जवळच राहायचा. नुकतीच दोनेक वर्षे झाली होती. त्यांच्या लग्नाला. बाळ दुपट्यातून रांगत चालायला लागले. नवरा खूप कमी बोलायचा, सगळं उमाच बोलायची. काही अडचणी, सूचना, भाड्याच्या काहीही कटकटी असतील तर उमा आणि माझा नवराच बोलायचे. मी तिच्या बाळाशी खेळत बसायचे. तिचा नवरा सगळं तटस्थपणे बघत बसलेला असायचा. आसपास असणाऱ्या मला ते फार खटकायचे, कारण माझ्या नवऱ्यावर उमाची फार वाईट छाप पडायची. तो मला वैतागून नंतर सांगायचा. ही किती बोलते, किती कटकट करते आणि तिचा नवरा काहीच बोलत नाही बिचारा...

मला तेव्हाही सारखं जाणवायचं की ही उमाच्या खांद्यावरची बंदूक तिची नाहीच आहे आणि गोळ्यापण तिच्या नाहीत. ती नुसतंच ओझं वाहतेय. स्वच्छतेची प्रचंड आवड असणारी उमा माझं घर खूप स्वच्छ ठेवायची.

घरात नेहमी टिपिकल गुजराती जैनपद्धतीचे पदार्थ स्वत: बनवून घालायची. मुलगी सगळी देखभाल व बाहेरची कामं सगळं उरकायची. तिच्या जेवणपद्धतीत प्रत्येक गोष्ट व्यवस्थित करण्याची तिची सवय दिसून यायची. या सगळ्या व्यवस्थेत खर्चपण व्हायचा. स्वदेशी गोष्टी आजकाल फार महाग झाल्यात. तिला या सगळ्या गोष्टींची सवय होती. मला, तिच्या नवऱ्याला या सगळ्या गोष्टींचं कौतुक आहे. असं सुरुवातीला वाटायचं. तो कंजूष वाटायचा. कधी बोलला तर बोलायचा. त्याचे आई-वडील मुंबईत चाळीत राहायचे. खूप जुन्या संस्काराचं जैन कुटुंब. त्यांचा हा एकुलता एक मुलगा. उमाला चाळीत कॉमन टॉयलेट-बाथरुम अशी सवय नसल्यामुळे तिथं बाळाला घेऊन राहणं जमेना म्हणून ती आमच्या साईडला तिच्या माहेराजवळ घर भाड्याने घेऊन राहायला आली. उच्चशिक्षित उमा बाहेरची, घरातली, मुलाची जबाबदारी सांभाळून त्यांच्या भाषेतल्या मासिकात लेखन करायची. पण तिच्या काही मैत्रिणी, माहेरची माणसं अधूनमधून कधीतरी भेटायची. सतत कुठल्या तरी कामासाठी कामगार लावून ती त्यांच्याकडून काही काही कामं करून घ्यायची. आम्ही पुन्हा बदली होऊन मुंबईला राहायला आलो. उमा आमच्याच बिल्डिंगमध्ये राहायला आली. कधीतरी लिफ्टमध्ये, गेटवर कुणाशी बोलताना, भांडताना भेटायची. सोसायटीत पण तिचं काही जणांशी पटायचं नाही. माझे-तिचे काही वैचारिक मतभेद सोडले तर उमा मला ठीक वाटायची. दोन वर्षांनी पुन्हा बदली. या वेळी घराचं नूतनीकरण करावं लागलं. पुणे-मुंबई दोन्हीकडं माझा संसार सुरू झाला. माझ्या मदतीला गावचीच एक मुलगी होती. तिलाही उमाची सोबत होईल, असं वाटलं. माझं काम ट्रस्टचं काम दुसरीकडे सुरू झालं होतं. त्यासाठी मला पैशांची गरज होती. उमाला घर दिले. पुन्हा आमच्या गप्पाटप्पा सुरू झाल्या. पलिकडच्या घरातून उमाचा तिच्या मुलाला मोठ्यानं बोलतानाचा आवाज यायचा. मला फारसा त्रास व्हायचा नाही. कारण माझाही स्वत:च्या कुटुंबातसुद्धा बऱ्यापैकी गोंधळच चाललेला असतो. कारण आमच्याकडे घरात माणसं भरपूर आहेत.

माझ्या नवऱ्याला तिच्या आवाजाने फार चिडायला होते. त्याला ती चीड-चीड अगदी आवरता येत नाही. मग मी तिला एकदा थोडेसे शांततेने घेऊन, गोडीने, प्रेमाने समजावून सांगितले. तिने ते मनावर घेतले, पण

■
भांडवलशाहीतल्या नात्यांची फरपट इतक्या उघडपणे बघण्याचा योग मला नेहमीच येतो. उमा सक्षम आहे. सुशिक्षित आहे. स्वतंत्रपणे स्वत:च्या आयुष्याचे निर्णय का घेऊ शकत नाही आणि तिचा नवरा स्वतंत्रपणे स्वत:च्या आयुष्याची सुरुवात करत नाही? आयुष्य हे आनंद मिळवण्यासाठी आहे की द्वेष करण्यासाठी आहे, हे कळत नाही.
------

तिच्यासाठी ते कठीण आहे, हे माझ्या लक्षात आले. मधल्या गाठीभेटींतून तिच्या वैयक्तिक आयुष्यातल्या बऱ्याच घडामोडी मला कळल्या होत्या.

नवरा - बायको एकत्र राहत नव्हते, पण घटस्फोटही झाला नव्हता. तिचा नवरा प्रचंड कंजूष होता. त्याने उमाला वीस वर्षांत घर, प्रॉपर्टी काहीही दिलेले नव्हते. तो खूप श्रीमंत होता. 'शेअर्समध्ये' असल्यामुळे खूप बिझी होता. वडिलोपार्जित धंद्यामध्ये चांगला जम होता. वडिलोपार्जित इस्टेट असल्यामुळे तो तिला काहीही खरेदी करून द्यायचा नाही. देऊ शकत नाही असं सांगायचा. मुलगा झाल्यानंतर त्या दोघांमध्ये काहीही वैवाहिक संबंध नाहीत, असं उमा सांगायची. त्याच्या नसण्याचा तिला काही एक त्रास आहे, असं मला वाटायचे नाही. एकदा बोलता बोलता ती म्हणाली ''भाभीजी वो मेरे अंदर कही पहुँचाही नही तो उसके न होने का मुझे कुछ अफसोस ही नही होता.''

लग्नानंतर त्यान बऱ्याच उशिरा सावळ्या उमाला तू गोरी असायला पाहिजे, होतीस असं सांगितलं. तिच्या माहेरी अडचणीत केलेल्या कुठल्याश्या मदतीच्या बदल्यात तिच्या गोऱ्या बहिणीत दिलचस्पी दाखवली आणि उमा तेव्हापासून मुलाबरोबर एकटी राहू लागली. तो अधूनमधून येऊन त्यांच्या खर्चासाठी पैसे व भाड्याची रक्कम देऊन जातो. त्याने दुसरं लग्न वगैरे काहीच केलं नाही.

उमा मुलाला काहीही कमी पडू नये, त्याला योग्य वळणं लागावं म्हणून सतत ओरडत असते. मला तर तिच्यामध्ये प्रचंड ऊर्जा दिसते. जगण्यामध्ये नीट-नीटकेपणा. स्वबळावर सगळी कामं निभावण्याची धमक, याचा मला अभिमान वाटायचा. मला तिची एकच बाजू माहीत आहे, असं माझ्या नवऱ्याचं म्हणणं. त्याला ती पुरुषसत्तेच प्रतीक वाटायची! तिच्या सगळ्याच गोष्टींना व्यवस्था जबाबदार आहे. याला त्याचा प्रचंड आक्षेप होता.

समतेचं महत्त्व जाणणारे आम्ही दोघेपण. पण त्याला उमाचं व्यवहारी असणं, पैशाबद्दल बोलणं का खटकतं मला समजत नाही? इतकी खंबीर उमा घटस्फोट का घेत नाही, मला कळत नाही. त्या दोन माणसांचं असं वेगळं असणं मला का अस्वस्थ करतं, मलाच कळत नाही?

या दरम्यान उमाची सासू वारली. मला वाटलं उमाचा नवरा तिच्याकडं राहायला येईल. पण तसं काही घडलं नाही. उमा अजूनही मुलाला घेऊन राहते. मुलाचं ग्रॅज्यूएशन पूर्ण झालं. उमा मध्ये युरोप टूर करून आली. एकटी. ती युरोप टूरला जायच्या अगोदर त्याने तिची भरपूर अडवणूक केली. तिची युरोप टूर कॅन्सल करण्यासाठी त्याने भरपूर प्रयत्न केले. एकमेकांच्या आनंदाचे क्षण कसे नासवता येतील, या प्रयत्नात असलेलं ते अजब जोडपं पाहून त्या सडलेल्या नात्याची प्रचंड कीव येते.

भांडवलशाहीतल्या नात्यांची फरपट इतक्या उघडपणे बघण्याचा योग मला नेहमीच येतो. उमा सक्षम आहे. सुशिक्षित आहे. स्वतंत्रपणे स्वत:च्या आयुष्याचे निर्णय का घेऊ शकत नाही आणि तिचा नवरा स्वतंत्रपणे स्वत:च्या आयुष्याची सुरुवात करत नाही? आयुष्य हे आनंद मिळवण्यासाठी आहे की द्वेष करण्यासाठी आहे, हे कळत नाही. तिचा मुलगा या सगळ्या प्रकाराकडे कशा पद्धतीने बघत असेल, काय विचार करत असेल, हे प्रश्न आहेतच.

■

सगुणा

अनुभव

# ...हवा **फक्त** आत्मविश्वास

कुमुद कोंडाळकर

'सगुणा'च्या माध्यमातून आज मला एक स्त्री या नात्याने माझे काही अनुभव सांगण्याची संधी मिळत आहे. तशी मी एक सामान्य महिला आहे. माझ्या मते मी फार काही नावलौकिक कमावला आहे. पण आतापर्यंतचा जीवनप्रवास हा बराच चांगला आणि काही कठीण अनुभव देणारा होता. माझा जन्म पुण्यात एका मध्यमवर्गीय कुटुंबात झाला. माझे वडील स्वातंत्र्य चळवळीत होते. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ते सरकारी नोकरी करू लागले. माझी आई सातवी शिकलेली. आम्ही चौघे भावंडं. लहान असताना गुरुवार पेठेत राहत होतो. माझ्या वडिलांना सरकारी क्वार्टर मिळाले आणि आम्ही पाषाणला राहायला आलो. त्या परिसरात फक्त कॉन्व्हेन्ट शाळा असल्यामुळे मला इंग्लिश मीडियममध्ये शिकायला मिळाले. वर्गात बहुतेक मुली श्रीमंताच्या होत्या. मला शाळेतच आपल्या मध्यमवर्गीय परिस्थितीची जाणीव झाली. मी हुशार असूनही मला संधी मिळत नव्हती. मात्र मी वर्गात पहिल्या दहामध्ये नंबर मिळवत होते. भरपूर अभ्यास करणे हा माझा नियम होता. मला निसर्गाची लहानपणापासून आवड होती. पक्षी, प्राणी, डोंगर, दऱ्या, झाडे, बगीचा या गोष्टींच्या सान्निध्यात माझे बालपण खुशीत गेले. तसेच स्वयंपाक, टेलरिंग, एम्ब्रॉयडरी हे सगळे आई आणि मोठ्या बहिणीकडून शिकायला मिळाले. शिक्षणाला स्त्रीच्या जीवनात विशेष महत्त्व असते. शिक्षणामुळे आपल्याला एक आत्मविश्वास मिळतो. त्यामुळे आपण आपले प्रश्न सहज सोडवू शकतो.

पदवी, लग्न, नोकरी, मूलं या सर्व गोष्टींतून माझा प्रवास सुरू झाला. लग्नानंतर मुंबईला राहावं लागलं. या मोठ्या शहराबद्दल माझ्या मनात भीती होती. पुण्यातला शांत, निसर्गमय परिसर आणि मुंबईतील एकाकी चेंबूरच्या धुराड्यात गेल्यावर नकोसे झाले. पण स्त्रिया संसारासाठी तडजोड करून बदल स्वीकारतात, तसेच माझे झाले. त्या वेळेस माझ्या घरचे मला मदत वा सहानुभूती देत होते. त्याबाबत मी स्वत:ला भाग्यवान समजते.

वयाच्या पस्तिसाव्या वर्षी चांगल्या नोकरीचा

राजीनामा (कारण मला लांबच्या ठिकाणी बदली नको होती) दिला. मी आमच्या गावी म्हणजे वाईला वास्तव्य करण्याचा निर्णय घेतला. बऱ्याच लोकांनी मला वेड्यात काढले, पण मला शेती आणि शेती पूरक व्यवसाय करण्याची खूप इच्छा होती. सासरचे सगळे लोक मदतीला होते. माझा निर्णय पक्का होता. गावी जायचं आणि नदीच्या उलट्या प्रवाहात पोहायचं!

मी पूर्णपणे शहरी वातावरणात वाढलेली. खेड्यातील बोलीभाषा आणि परिस्थिती समजायला मला थोडा वेळ लागला; पण शेती आणि एकंदर शांत निसर्गाची आवड असल्याने मी तिथं अगदी रमून गेले. ग्रामीण भागात काम करत असताना तेथील सामाजिक प्रश्न मला समजू शकले. मला ट्रेकिंगची आवड असल्याने त्या परिसरातील सर्व डोंगरदऱ्या, किल्ले आणि मंदिरे पाहून झाली. तिथे घडलेल्या इतिहासाचा अभ्यास झाला. स्वच्छ हवा, पाणी आणि सकस अन्न...बस्स, आणि काय लागतं माणसाला? मातीशी प्रेम करण्याचा आनंद मी अनुभवला. शहरातल्या लोकांना ग्रामीण जीवनाची चव कळावी म्हणून मी एक फार्महाऊस- हॉलीडे रिसॉर्ट चालू केले. शेतीला पूरक म्हणून सुरू केलेला हा व्यवसाय आज नावारूपाला आला आहे. आज आमच्याकडे अनेक लोक निसर्गाच्या सान्निध्यात राहण्यासाठी येतात.

मुलांचे शिक्षण पुण्यात चालू असताना मला वरचेवर पुण्यास यावे लागायचे. आपण काहीतरी शिकावे असे वाटले. मग पुणे विद्यापीठात स्त्री अभ्यास केंद्राला भेट दिली. कोर्स सुरू केला. अनेक सामाजिक कार्यकर्त्यांशी चर्चा होऊ लागली. ज्वलंत प्रश्न, वेश्यांशी संवाद वगैरे वगैरे - आणि मी एक स्त्री म्हणून नेमके काय करायचे, असे प्रश्न आणि शंका. या कोर्समध्ये मी प्रथम श्रेणी मिळवली. आपल्याला आपल्याशिवाय इतर बरेच काही माहीत नसते. रूढी-परंपरेने स्त्रीला अंधारात ठेवले आहे.

शिक्षण संपवून मुलं आपापल्या उद्योगाला लागली. मी पुन्हा गावी राहू लागले. एक स्त्री उद्योजक म्हणून मला जिल्ह्यात प्रसिद्धी मिळाली होती. आमचे येथे सरकारमान्य प्रायोगिक रेशीम केंद्र आहे. मी तुतीची लागवड करून अव्वल दर्जाचे कोश तयार केले. चार वर्षे काही ग्रामीण महिलांना काम देऊन रेशीम उद्योग केला. त्याबरोबर नारळ, आंबा, लिंबू या झाडांची लागवड केली. हे सगळे करत असताना कष्ट खूप करावे लागले. मार्केटचे ट्रेंड पाहून काही उद्योग धंदे करावे लागले. कधी आर्थिक फटकेही बसले. अशा वेळी आपल्या घरच्या लोकांचे सहकार्य आणि सहानुभूती ही फार महत्त्वाची ठरते. ती मला पूर्ण मिळत होती.

याच काळात माझी भारतीय स्त्रीवादी पक्षाच्या कार्यकर्त्यांशी ओळख झाली. मला वाटले की खरंच या महिला पक्षासाठी आपण काही केले पाहिजे. आणि चक्क मी निवडणुकीसाठी वाईमधून उभी राहिले. तो एक अतिशय वेगळा अनुभव होता. राजकारणात स्त्रियांचे महत्त्व कमी होत आहे. त्या निमित्तमात्र असतात, हे लक्षात आले. घराणेशाही राजकारणी वाट लावत आहे. जोपर्यंत स्त्रिया मोठ्याप्रमाणात राजकारणात येत नाहीत. तोपर्यंत क्रिमिलायझेजन ऑफ पॉलिटिक्स, हे होत राहणार.

जीवनप्रवास चालू आहे. मी आता आजी झाले आहे. अजूनही मला असे वाटते की आपण स्त्रियांसाठी काही तरी करावे. काही नाही तर त्यांना चांगले आणि वेगळे विचार द्यावेत. आपले अनुभव सांगावेत आणि त्यांच्या अडचणीत त्यांना मदत करावी. स्त्रीने निश्चय केला तर ती कुठलेही काम करू शकते. कारण समाज जरी तिच्या बाजूने नसला तरी कायदा आहे. स्त्रियांमध्ये एकी असायला पाहिजे. आज आपल्या पुढे अशा अनेक स्त्रियांची उदाहरणे आहेत, ज्या अतिशय कठीण परिस्थितीतून समाजासाठी मोलाचे काम करीत आहेत. आपण त्यांना आदर्श मानून कार्य करायची मनाची तयारी केली पाहिजे. आपला आत्मविश्वास आणि परिश्रम आपल्याला सर्व काही मिळवून देऊ शकतो.

■

कुमुद कोंडाळकर
वाई, जि० सातारा.

## सगुणा

शोभा करांडे

# कविता

। १ ।
अनेक फार्मावर छापलेली
सरकार दरबारी पोचलेली
माझा सगळा द्वेष सोसलेली
माझ्याच नकारात्मकतेवर पोसलेली
गर्दीत स्वत:लाच चाचपडताना
आतला शुद्ध माणूस जखमी
करत राहतो...नागड्या तलवारीसारखा
तेव्हा कसं वाचवायचं स्वत:ला स्वत:पासूनच?
खोलवर शोधत जावीत मुळं तर अंधारात गरगरते?
संपण्याची, हरण्याची भीती
मणक्यामध्ये सळसळत राहते
विहिरीसारखी तुडुंब भरलेली मायेची, प्रेमाची सारी बंधने
नव्या नव्या जबाबदाऱ्या आणि जीवंत वाटणारी आव्हाने
विहिरीतून घागर भरून घ्यावी
तशी ती भरून घेते आणि माझं माणूस
असणं मी भोगीत राहते
'हिंदू मराठा बाई' ही ओळख स. दे. श.
सगळ्यांच्या सोयीची असते, माझ्या व्याख्या
त्यामध्ये करणं त्यांना सोपे जाते, मात्र माझ्या आतल्या
माणसाबरोबरची लढाई मी रोजच हारते, रोजच हारते.

। २ ।
मंतरलेल्या संध्याकाळी
काळ मोहक रंगबेरंगी स्वप्नांना
समोर ठेवून हलक्या पावलांनी
दरवाजा उघडून दाखल होतो
अनिभिज्ञता अजाणतेपणी अडखळते
हिरवे दंश - विषारी फुत्कार लपवत
ते अलगद वेढून राहतात
नियतीच्या चक्राची ती कोणती खेळी होती
जिचा फास आवळत चालला होता
निष्पाप निरागसतेला कलंकित
करण्याचे डाव हवेमध्ये मिसळले होते
कसला विचित्र सापळा तयार होता
अडकतानाही अज्ञान - अनिभिज्ञ
सोडता नाही कसली विचारणा नव्हती
जगणं जमत नव्हतं, मरण हातात नव्हतं
वेटोळ्यांचा पायाला पडलेला वेढा
बाहेर येऊ नये म्हणून उभा फणा
थंड रक्ताची मारेकरी नजर सतत पाळतीवर
आयुष्याचा हिशोब करणाऱ्या चित्रगुप्तासारखी
बेरकी हिशोबी वृत्ती
कधीतरी फसवूनच करील
प्रेमाची सारी वजाबाकी
वाचवलं पाहिजे त्यापासून
आता पुढच्या सगळ्यांना नाहीतर
मोकाट - सुसाट सुटतील
सारे बेचिराख करत
फसवे, निसरडे रस्ते साफ करायला हवेत
अपघात टाळले पाहिजेत
सगळी निष्पापता सोडून
हिशोब चुकवावे लागतील